


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७३ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# अखेर राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून घेतली शपथ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांचा राजकीय वारसा पुढे कोण नेणार असा प्रश्न पडला होता. याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले होते. अखेर अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी विराजमान होणार असून त्यांनी आज सायंकाळी ५ वाजता मुंबईत मंत्री म्हून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. त्या राज्याच्या १३ व्या उपमुख्यमंत्री असून, त्यांच्या रुपानं पहिल्यांदाच महाराष्ट्राला महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या आहेत. मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा लोकभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमासाठी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहीण सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्यासोबत लग्न केल्यानंतर स्वतः सामाजिक कार्यात झोकून दिले. त्यांचा सामाजिक प्रवास अनेकांसाठी प्रेरणा देणारा आहे. अजित पवार यांनी देखील त्यांच्या अनेक भाषणांमध्ये सुनेत्रा पवारांची त्यांच्या जीवनात मोलाची साथ लाभली असल्याचे वेळोवेळी सांगितले आहे. १८ ऑक्टोबर १९६३ या दिवशी सुनेत्रा पवार यांचा धाराशिव या ठिकाणी जन्म झाला. त्या राजकीय पार्श्वभूमीवर असलेल्या कुटुंबातून येतात. त्यांचे बंधू पद्मसिंह पाटील हे मंत्री होते. त्यामुळे त्यांना राजकीय वारसा जन्मतःच लाभलेला आहे.

१९८५ मध्ये सुनेत्रा पवार यांचा अजित पवार यांच्यासोबत विवाह झाला. लग्नानंतर काटेवाडी येथे आल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. काटेवाडीमध्ये ग्रामस्वच्छता चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. या कार्याची दखल घेत देश-विदेशातून अभ्यासकांनी काटेवाडीला भेट दिली. याच कामामुळे सुनेत्रा पवार यांना सार्क देशांच्या साकोसान परिषदेत सहा राष्ट्रप्रमुखांसमोर भाषण करण्याची संधी मिळाली.

विशेष म्हणजे सुनेत्रा पवार यांनी सामाजिक कामात स्वतः वाहून देऊन काम केले. त्या पहाटे पासून स्वतः हातात खराटा घेऊन कामाला सुरुवात करत. त्यांनी संपूर्ण गावालाच या अभियानात सहभागी केले.



## थोडक्यात...

### विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात तक्रार

**पुणे (समर्थ गांवकरी) :** महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आयोजित एका खासगी ऑनलाईन बैठकीचे बेकायदा रेकॉर्डिंग करून ते प्रसारित केल्याप्रकरणी प्रतिस्पर्धी परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे उमेदवार विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात जळगाव सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. साहित्य संवर्धन आघाडीने ही तक्रार केली असून, कुलकर्णी यांनी बदनामी केल्याचा आरोप आहे. जळगाव येथील राजेंद्र लखीचंद नन्नावरे (वय 56) यांनी ही तक्रार दिली आहे. विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम 356 (बदनामी), कलम 499 आणि 500 (मानहानी) तसेच माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम 66 ई आणि 72 नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदारांनी दिलेल्या माहितीनुसार, 26 जानेवारी 2026 रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या नियोजनासाठी ही खासगी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या रेकॉर्डिंगसाठी कोणतीही संमती देण्यात आली नव्हती. असे असतानाही विनोद कुलकर्णी यांनी या बैठकीचे गुपचूप रेकॉर्डिंग करून गोपनीयतेचा भंग केल्याचा आरोप आहे.

### पुण्यात 25 वर्षीय महिलेवर दुर्मीळ ट्यूमर, टीबीवर यशस्वी उपचार

**पुणे (समर्थ गांवकरी) :** पुण्यात एका 25 वर्षीय महिलेवर प्रसूतीनंतर निदान झालेल्या दुर्मीळ मेसेंटेरिक ट्यूमर आणि पोटाच्या क्षयरोगावर यशस्वी उपचार करण्यात आले. खराडी येथील मदरहुड हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी हे गुंतागुंतीचे प्रकरण हाताळले, ज्यामुळे महिलेचा जीव वाचला. या महिलेने ऑक्टोबर 2024 मध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे एका निरोगी बाळाला जन्म दिला होता. गर्भधारणेदरम्यान तिच्या गर्भाशयावर 10 ते 12 सेंटीमीटरचा फायब्रॉइड आढळला होता.

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची अजितदादांची शेवटची इच्छा

- दादा, सुप्रिया सुळे अन् तटकरेंमध्ये बैठक झाली होती, अनिल देशमुखांचा गौप्यस्फोट

**सातारा : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे. "दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र याव्यात अशी अजितदादांची इच्छा होती. त्यासाठी सगळे ठरले होते. अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळेंची बैठक झाली होती. जयंत पाटलांच्या घरी पहाटेपर्यंत बैठका चालल्या," असा दावा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. अजितदादांची ही शेवटची



इच्छा पूर्ण करावी, अशी भावनिक सादही त्यांनी यावेळी घातली. विमान अपघातात अजित पवार यांच्यासोबत त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव यांचाही मृत्यू झाला होता. अनिल देशमुख हे आज विदीप जाधव यांच्या साताऱ्यातील तरडगाव येथील घरी सांत्वनपर भेटीसाठी आले होते. यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनिकरणाबाबत मोठे गौप्यस्फोट केले. अनिल देशमुख यांनी दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत अनेक धक्कादायक तपशील समोर आणले आहेत. ते म्हणाले की, दोन्ही पक्ष एकत्र आणण्यासाठी आतापर्यंत एकूण १२ ते १३ बैठका पार पडल्या होत्या. शेवटची महत्त्वाची बैठक राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या घरी झाली होती. ही बैठक रात्री १० वाजता सुरू होऊन पहाटे ३ वाजेपर्यंत चालली होती. या बैठकीला ८ ते १० प्रमुख नेते उपस्थित होते. अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळे यांचीही या विषयावर स्वतंत्रपणे बैठक झाली होती. या सर्व चर्चांनंतर 'काय करायचे आणि कसे करायचे' हे सर्व ठरले होते. अजित पवार यांच्या मनात शरद पवारांबद्दल असलेल्या आदराचा उल्लेख करताना देशमुख म्हणाले, "पवार साहेबांचे वय पाहता त्यांना आता अधिक त्रास देऊ नये, अशी अजितदादांची मनापासूनची भावना होती. दोन्ही पक्ष एकत्र यावेत, ही दादांची शेवटची इच्छा होती. आम्ही त्यांच्याशी झालेल्या १२ बैठकांचा तपशील साहेबांनाही दिला होता.

### शपथविधीच्या घाईवर नाराजी

आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावर बोलताना देशमुखांनी सुनेत्रा वहिनींचे अभिनंदन केले, पण सरकारच्या घाईवर टीका केली. "सुनेत्रा वहिनी उपमुख्यमंत्री झाल्या याचा आनंदच आहे, मात्र सध्या दुखवट्याची वेळ आहे. इतक्या घाईत शपथविधी उरकण्याची काहीच आवश्यकता नव्हती," अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

# इराणमधील ७ शहरांमध्ये स्फोट, ५ लोकांचा मृत्यू



**तेहरान : (समर्थ गांवकरी)**

इराणमधील किमान 7 शहरांमध्ये स्फोटांची बातमी आहे. विविध मीडिया रिपोर्ट्सनुसार, शनिवारी राजधानी तेहरान, परंद, तबरीज, कोम, अहवाज, नंताज आणि बंदर अब्बास येथे स्फोट झाल्याचे दावे करण्यात आले आहेत.

तुर्कस्तानच्या अनादोलु वृत्तसंस्थेनुसार, किमान 5 लोकांचा मृत्यू झाला आहे आणि 14 जण जखमी झाले आहेत. इराण सरकारने याची पुष्टी केलेली नाही. मात्र, इस्रायलच्या दोन अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितले आहे की, या स्फोटांमध्ये इस्रायलचा सहभाग नाही. दरम्यान, तसनीम वृत्तसंस्थेने सोशल मीडियावर सुरू असलेल्या त्या बातम्यांना चुकीचे ठरवले आहे, ज्यात रिव्होल्यूशनरी गार्डच्या नौदल कमांडरला लक्ष्य करण्यात आल्याचे म्हटले जात होते.

# पक्ष एकत्र असला की दुसरे लोक घुसखोरी करणार नाहीत

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील लोकभवनात सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या चर्चांना उधाण आले आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. शपथविधीच्या वेळी सभागृहात अजित पवार अमर रहे, अशा घोषणा देण्यात आल्या. वातावरण भावूक आणि तितकेच राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे होते. या सोहळ्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी दिलेली प्रतिक्रिया आता चर्चेचा विषय ठरली आहे. शपथविधीनंतर माध्यमांशी



बोलताना अमोल मिटकरी यांनी स्पष्टपणे सांगितले की, अजित पवार यांची उणीव कोणत्याही परिस्थितीत भरून निघू शकत नाही. आमच्यासारखे अनेकजण आज दादांना खूप मिस करत होते, असे म्हणताना ते भावूक झाले. त्यांनी पुढे सांगितले की, सुनेत्रा पवार यांनी अत्यंत जड अंतःकरणाने उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. सुनेत्रा वहिनींनी हे शिवधनुष्य उचलले आहे, असे म्हणत त्यांनी त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.


# पाच सामन्यांच्या मालिकेत न्यूझीलंडचा सुपडा साफ

### टीम इंडियाचा मोठा विजय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

टी-20 वर्ल्डकपच्या रणधुमाळीपूर्वी भारतीय संघाने आपली तयारी पूर्ण केल्याचे संकेत दिले आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेत टीम इंडियाने 4-1 असा विजय मिळवत मालिकेवर वर्चस्व गाजवले. तिरुअनंतपुरम येथे झालेल्या अखेरच्या सामन्यात भारताने पाहुण्या संघाचा 46 धावांनी धुव्वा उडवला.

वर्ल्डकपपूर्वी ईशान किशनने आपल्या टी-20 आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक झळकावत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्याला कर्णधार सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पांड्या यांची मोलाची साथ लाभली. या तिघांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर टीम इंडियाने अवघ्या 5 विकेट्स गमावत 271 धावांचा भल्यामोठा डोंगर



उभारला. इतक्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ 225 धावांतच आटोपला. या मालिकेतील विजयासह टीम इंडियाने टी-20 वर्ल्डकपपूर्वी आपला अभ्यास पूर्ण केला असून संघाचा आत्मविश्वास शिखरावर पोहोचल्याचे चित्र दिसत आहे.

टीम इंडियासाठी अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी सलामीला मैदानात प्रवेश केला. मात्र या मालिकेत संजू सॅमसनची फलंदाजी पुन्हा एकदा अपयशी ठरली. संजू अवघ्या 6 चेंडूमध्ये 6 धावा करून बाद झाला. न्यूझीलंडच्या लॉकी फर्ग्युसनने त्याला माघारी पाठवले. यानंतर अभिषेक शर्माने आक्रमक फलंदाजी करत संघाला दमदार सुरुवात करून दिली. त्याने 16 चेंडूमध्ये 30 धावा केल्या. या खेळीत 4 चौकार आणि 2 षटकारांचा समावेश होता. मात्र अभिषेकलाही लॉकी फर्ग्युसननेच पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. तिसऱ्या विकेटसाठी ईशान किशन आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यात 137 धावांची जबरदस्त भागीदारी झाली. या दरम्यान दोघांनी चौकारांपेक्षा अधिक षटकार ठोकत न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. सूर्यकुमार यादवने शानदार अर्धशतक झळकावत 30 चेंडूमध्ये 63 धावा केल्या. या खेळीत त्याने 4 चौकार आणि 6 षटकार मारले. अखेर मिचेल सँटनरने सूर्यकुमारला बाद केले. ईशान किशनने या सामन्यात टी-20 आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिले शतक ठोकले. अवघ्या 42 चेंडूमध्ये त्याने शतक पूर्ण केले. पुढे तो 43 चेंडूमध्ये 103 धावांची तुफानी खेळी करून बाद झाला. या खेळीत ईशानने 6 चौकार आणि तब्बल 10 षटकार लगावले. शेवटी हार्दिक पांड्याने 17 चेंडूंमध्ये 47 धावांची स्फोटक खेळी केली. रिंकू सिंग 8 धावा आणि शिवम दुबे 7 धावांवर नाबाद राहिले. न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसनने 2 विकेट्स घेतल्या. सलामीवीर टिम सेफर्ट स्वस्तात बाद झाला. सेफर्टला अवघ्या 5 धावांवर अर्शदीप सिंगने माघारी धाडले. त्यानंतर फिन ॲलनने आक्रमक फलंदाजी करत न्यूझीलंडला सामन्यात परत आणण्याचा प्रयत्न केला. ॲलनने सात चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने केवळ 22 चेंडूत अर्धशतक झळकावले. ॲलन शतकाच्या दिशेने वाटचाल करत होता, मात्र अक्षर पटेलने त्याची झंझावाती खेळी थांबवली. ॲलनने 6 षटकार आणि 8 चौकारांसह 30 चेंडूत 80 धावांची शानदार खेळी केली.

# न्यायालयीन कामकाजातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी ठरणार महत्त्वाची

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर' (BBATRC) चे कौतुक करीत मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबईत या ऐतिहासिक वास्तूचे लोकार्पण केले. याप्रसंगी बोलताना त्यांनी आवर्जून नमूद केले की, ज्याप्रमाणे न्यायमूर्तींसाठी प्रशिक्षण अकॅडमी आहे, त्याप्रमाणे वकिलांसाठी प्रशिक्षण अकॅडमी का नाही, याचे उत्तर आज बार कौन्सिलने दिले आहे. कायद्याचे शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज (कोर्ट क्राफ्ट) यातील दरी भरून काढण्यासाठी ही अकॅडमी अत्यंत महत्त्वाची ठरेल.

तळोजा येथील या अकॅडमीचे उद्घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री.चंद्रशेखर यांनी भूषविले.यावेळी व्यासपीठावर मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ॲड. अनिल सी. सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ.मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता ॲड. देविदास पांगम यांची प्रमुख उपस्थिती होती.



मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, राज्य सरकारने कायदेविषयक प्रशिक्षण आणि संशोधनाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या जागेचा अतिशय उत्तम उपयोग करून अतिशय कमी कालावधीत ही उत्कृष्ट वास्तू उभारली गेली आहे. अकॅडमीच्या इमारतीचे दर्जेदार आणि अल्पावधीत पूर्ण झालेले बांधकाम हे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्यशैलीची आठवण करून देणारे असल्याचे सांगून त्यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वकिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्याचा निर्णय हा देशातील पहिलाच निर्णय असून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र यांनी घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुक केले.

बदलते कायदे, नवीन फौजदारी कायदे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी प्रशिक्षित वकील आणि अभियोजक तयार करणे आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी अकॅडमीसाठी राज्य शासनाकडून १० कोटी रुपयांचे अनुदान आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वितरित केले जाईल, असेही सांगितले. विस्तारित अर्थव्यवस्थेनुसार तंत्रज्ञानातील बदलांशी अनुरूप आपली यंत्रणा प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.पिटिशन ड्राफ्टिंगसाठी एआयचा उपयोग करताना होणाऱ्या धोक्यांबाबतही सतर्क राहायला हवे. संशोधनाशिवाय गुणवत्ता येत नाही, त्यामुळे हे रिसर्च सेंटर भविष्यात दर्जेदार कायदेविषयक संशोधनाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वरिष्ठ वकील तथा BCMG चे अध्यक्ष हर्षद निंबाळकर यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'विधी महर्षी पुरस्कार' न्यायमूर्ती बी.बी. चव्हाण यांना प्रदान करण्यात आला, तर अमरावतीचे दिवाणी वकील ज्ञानेश्वर बावरेकर यांचा मरणोत्तर पुरस्कार त्यांचे पुत्र ॲड. संजय बावरेकर यांनी स्वीकारला.

या सोहळ्याला बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (BCMG) चे उपाध्यक्ष ॲड. जयंत डी. जायभावे, BBATRC चे अध्यक्ष ॲड. डॉ. उदय पी. वारुंजीकर, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (BCI) सदस्य ॲड. आशिष पी. देशमुख आणि समन्वयक व उपाध्यक्ष ॲड. संग्राम डी. देसाई उपस्थित होते. तसेच बार कौन्सिलचे सदस्य ॲड. मोतीसिंह जी. मोहता, ॲड. गजानन बी. चव्हाण, ॲड. मिलिंद एस. पाटील, ॲड. वंसत डी. साळुंखे, ॲड. मिलिंद एस. थोबडे, ॲड. अविनाश जे. भिडे, ॲड. वसंतराव ई. भोसले, ॲड. अनिल एम. गोवर्दिपे, ॲड. विवेकानंद एन. घाटगे, ॲड. आसिफ एस. कुरेशी, ॲड. अविनाश बी. आव्हाड, ॲड. अमोल एस. सावंत, ॲड. अण्णाराव जी. पाटील, ॲड. सतीश ए. देशमुख, सीनिअर ॲड. सुदीप आर. पासबोला, ॲड. सुभाष जे. घाटगे, ॲड. विठ्ठल बी. कोंडे-देशमुख, ॲड. अहमदखान यू. पठाण, ॲड. राजेंद्र बी. उमाप आणि ॲड. पारिजात एम. पांडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

# किरकोळ वादातून भरदिवसा एकाची हत्या

## दोन तासात तीनही आरोपी शिळ-डायघर पोलीसांकडून अटकेत

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिनांक २९/०१/२०२६ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास रिगल हॉटेलच्या बाजुस, शिळफाटा ता. जि.ठाणे येथे इसम नामे सैफअलि खान याने तक्रारदार महमंद शेख यास चारचाकी व्हॅगॅनोर कार क्रमांक MH 02 GH 9367 ही डिपॉझीटची रक्कम घेवून व प्रतिदिन भाडे ठरवून चालविणे करीता दिलेली होती. सदरचे वाहन तक्रारदार याने परत दिले होते परंतु आरोपी डिपॉझीटची रक्कम परत देत नव्हता यावरून त्याच्यामध्ये वाद निर्माण झाल्याने सैफअलि खान याने डिपॉझीटची रक्कम तकारदार यास परत देण्याकरीता बोलाविले असता सदर रक्कम स्विकारणे करीता तक्रारदार महमंद शेख व त्याचे मित्र अबुतालीब, सचिन व अमन शेख यांच्यासह सदर ठिकाणी आले असता सैफअलि खान हा शोएब खान व आरिफ खान याचे सोबत चारचाकी कार कमांक MH 02 GH 9367 हीने सदर ठिकाणी आला. त्यावेळी त्याच्यात वाद होवून शिवीगाळ व हाताने धक्काबुक्की झाली तेव्हा आरिफ खान याने अमन शेख याचे दोन्ही हात पाठीमागुन पकडले त्यावेळी सैफअली खान व शोएब खान याने त्याच्या जवळील धारदार चाकुने त्याच्या छातीवर जोराने वार करून त्याचा खुन केला आहे. तसेच अबुतालीब हा त्यास वाचवण्याकरीता गेला असता त्यांच्या डाव्या हातावर कोपराखाली चाकुने दुखापत केली त्या तिघांनी तक्रारदार यांचे जबरदस्तीने अपहरण करून 'अभि इसका भी काम कर डालते है' असे धमकावुन त्यांनी मारहाण केली व तक्रारदार योच खिश्यातील ५०००/-रूपये रोख असे जबरदस्ती काढुन घेतले म्हणून इसम नामे १) सैफअली निजामउद्दीन खान वय २९ वर्षे, २) शोएब निजामउद्दीन खान वय २० वर्षे, ३) आरिफ आताउल खान वय २८ वर्षे, सर्व राहणार सध्या डोबिंवली, मानपाडा (पूर्व) यांच्या विरोधात तक्रारदार महमंद शेख याचे तकारी वरून शिळ डायघर पोलीस ठाण्यात गु. रजि. नं. ६६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३(१), १४० (१), ११५(२), ११८ (१), ३०९ (६), ३५१ (३), ३(५) सह महाराष्ट पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे नमूद आरोपीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



मा. वरिष्ठांच्या मागदर्शनाखाली शिळ-डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. श्रीराम पौळ यांनी आरोपीचा शोध तपासकामी अधिनस्त अधिकारी / अंमलदार यांचे दोन तपास पथके तयार केली. गुन्हयाचा तपास चालू असताना गुप्त बातमीदार व तांत्रीक तपासाच्या आधारे आरोपीचा कसोशीने शोध घेवुन सदर गुन्हयात आरोपी नामे १) सैफअली निजामउद्दीन खान वय २९ वर्षे, २) शोएब निजामउद्दीन खान वय २० वर्षे, ३) आरिफ आताउल खान वय २८ वर्षे, सर्व राहणार सध्या डोबिंवली, मानपाडा (पूर्व) यांना देसाई गांव येथून ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातील जिवेठार मारण्याच्या उददेशाने अपहरण केलेला तक्रारदार महमंद शेख याची सुटका करून त्याचा जिव वाचविला.

# मेहेरबाबाच्या समाधी स्थळी हजारो मेहेरप्रेमींनी पाळले १५ मिनिटे मौन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



बिगिन दि बिगिन ही धून पावणे बारा वाजता वाजवण्यात आली नंतर नगर सेंटरने च्या सदस्यांनी मेहेरधून म्हटली. दु १२ वा मौनास सुरुवात झाली यावेळी सर्वत्र शांतता होती टाचणी पडली तरी समजेल इतकी शांत वातावरण होते. १५ मिनिटानंतर अवतार मेहेर बाबा कि जय च्या जयघोषात मौन सोडण्यात आले. यावेळी टेकडीवर ६५ हजाराच्या वर भाविक होते. अवतार मेहेरबाबाच्या समाधी स्थळी ५७ वी अमरतिथी सोहळात आज ३१ जानेला बाबांनी देहत्याग केला त्यावेळेस दु १२ वा दौंड रोडवरील मेहराबाद (अरणगाव)येथे सुमारे ६५ हजार भाविकाचे मौन पाळले तर जगात लाखो भाविकांनी याच वेळेस मौन पाळले. कालपासून सुरु झालेल्या अमरतिथी साठी हजारो भाविक बसतील असा भव्य मंडप आहे.त्याव्यतिरिक्त जेथे मिळेल भाविक बसून होते अवतार मेहेरबाबांनी मौनास सुरवात केल्यावर शेवटपर्यंत मौन पाळले म्हणून आज हे महामौन पाळले जाते. सकाळी भजनास सुरवात झाली नंतर मेहेरधून म्हटली गेली नंतर मुख्य मंडपात कार्यक्रम सुरु झाले आजहि समाधीचे दर्शन घेण्यास रांगा लागल्या होत्या. भारतातून सुमारे ८०,००० मेहेरप्रेमी आले आहेत कोठेहि गडबड,गोंधळ नव्हता सांस्कृतिक कार्यक्रम दिवसभर चालू होता त्यात मेहेर प्रेमीनी भजने, गजल, नृत्ये, कव्वाली, गाणे, नाटिका सादर केल्या.

# वादविवाद व वक्तृत्व स्पर्धामुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास होतो - डॉ. राहुल देशमुख



**राजूर : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना देणारे व्यासपीठ म्हणजे वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धा होय. स्पर्धांमधून स्पर्धकांना वैचारिक मेजवानी मिळते. बोलण्याचे संस्कार होतात आणि आत्मविश्वासाने ते जीवनात यशस्वी होतात.तसेच अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सप्त गुणांचा विकास होतो असे प्रतिपादन श्री ओंकारनाथ विधी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ .राहुल देशमुख यांनी केले. ते राजुर येथील अ‍ॅड.एम.एन. देशमुख कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कै. होनाजी तुकाराम कोंडार स्मृतीचषक राज्यस्तरीय वादविवाद आणि कै. डॉ. माधवराव दिगंबर उमराणी स्मृतीचषक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती मंगलताई कोंडार ह्या उपस्थित होत्या.आपल्या शुभेच्छा पर भाषणात त्या म्हणाल्या की," विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून अधिकाधिक स्पर्धामध्ये सहभागी व्हावे."

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी " बहुआयामी व्यक्तिमत्व निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धामध्ये सहभागी व्हावे असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. सत्यनिकेतन संस्थेचे संचालक एस.टी. येलमामे यांनी स्पर्धकांना आत्मविश्वासाने बोलण्याचा मंत्र दिला. यावेळी विजय पवार, संचालक सत्यनिकेतन,परीक्षक प्रा. मच्छिंद्र देशमुख, प्रा. डॉ. मोहन शिंदे, प्राध्यापक वृंद, स्पर्धक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाच्या वादविवाद व वक्तृत्व मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. पंढरीनाथ करंडे यांनी केले. अतिथींचा परिचय प्रा. डॉ. रावसाहेब ननावरे यांनी करून दिला.तर प्रा.प्राची कोंडार यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश कुसमुडे यांनी केले.

# श्री गजानन महाराज प्रकट दिनांनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर येथील श्री गजानन महाराज सांस्कृतिक मंडळ वार्ड नं ३ यांचे वतीने सालाबादप्रमाणे या ही वर्षी या ठिकाणी श्री गजानन महाराज प्रकटदिन साजरा होत असुन यानिमित्त श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करण्यात येत आहे तरी पारायण रविवार दिंनाक १ फेब्रुवारी ते रविवार दिनांक ८ फेबुवारी असे आयोजित केले आहे तरी सर्व भाविकांनी कार्यक्रमांचा दर्शनाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समिती यांचे वतीने करण्यात आले आहे.

# अजितदादा पवार यांना ओतुर. कडून भावनिक आदरांजली – कडकडीत बंद

- राजकारणात अनेक नेते येतात–जातात
- पण कामाचा दादा माणूस असा नेता पुन्हा होणार नाही
- धन्य ती माय माऊली, जिने असा हिरा जन्माला घातला

**ओतूर(कळवण): (समर्थ गांवकरी)**




राज्यातील कोट्यवधी जनतेच्या मनात घर करून राहिलेले, विकासाचे प्रतीक मानले जाणारे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याविषयी ओतुर गावात अपार प्रेम आणि आदर आहे. दादांच्या नेतृत्वाखाली झालेला विकास, त्यांनी दिलेले निर्णय आणि सामान्य जनतेसाठी घेतलेली ठाम भूमिका यामुळे ते जनतेच्या मनात कायमचे स्थान मिळवून गेले आहेत.

कळवण मतदारसंघाचे आमदार नितीन भाऊ पवार यांच्यावर अजितदादांचे विशेष प्रेम होते. कळवण तालुका व मतदारसंघाच्या विकासासाठी दादांनी मागील पंचवार्षिक काळात सुमारे २२०० कोटी रुपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून दिला. तसेच ओतूर, जामशेत, श्रीभुवन धरण यांसारख्या शेतकऱ्यांसाठी कल्याणकारी महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करून तालुक्याच्या विकासाला गती दिली.

याच विकासाभिमुख कार्याची आठवण म्हणून कळवण तालुक्यातील अनेक गाव खेड्यातील व्यापारी व्यवसायिक शेतकरी बांधवांनी आपली दुकाने बंद ठेवत भावनिक एकजूट दाखवली. ओतुर गावातही ग्रामस्थांनी काही निवडक दुकानदार सोडून एकत्र येत कडकडीत बंद पाळून दादांप्रती आपली भावना व्यक्त केली.

अजितदादा पवार आणि आमदार नितीन पवार यांच्यातील भावकीसारखे अतिशय घनिष्ठ संबंध असल्यामुळे अनेक वर्षांनुवर्षे प्रलंबित असलेला ओतूर धरण प्रकल्प मार्गी लागला.काही महीन्यात या धरणाचे काम पूर्ण होऊन अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते लोकार्पण होणार होते, ग्रामपंचायत ओ ओतूर चे सरपंच पार्वता गांगुर्डे-व -उपसरपंच जान्हवी मोरे यांनी सांगितले .

दुष्काळाच्या झळा सोसलेल्या,ओतूर , कुंडाणे सिरसमणी ,भुसणी परिसरातील शेतकरी भावूक होत म्हणाले,

“आमची शेतशिवार हिरवीगार होणार होती. राजकारणात नेते अनेक होतील, पण कामाचा दादा माणूस अजितदादांसारखा होणार नाही.

ओतूर धरणाला अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे,” अशी मागणी स्थानिक शेतकरी, युवराज मोरे, देवा भुजाडे, यांनी व्यक्त केली .

अजितदादा पवार हे नाव केवळ एक नेता नसून, ते विकास, धाडस आणि जनतेशी नाळ जोडलेला विश्वास आहे—अशी भावना आजही कुंडाणे ओ गावाच्या प्रत्येक मनात आहे.

# स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना श्रद्धांजली

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




अहिल्यानगर येथील महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नगराचे विकास कामातून बदललेले रूप म्हणजेच स्वर्गीय अजित दादा होय, असे मत आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले.

यावेळी आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, गटनेते प्रकाश भागानगरे, महापौर भगवान फुलसोदर, नगरसेवक कुमार सिंह वाकळे, अविनाश घुले, बाळासाहेब बारस्कर, बाळासाहेब पवार, संजय चोपडा, राजेंद्र गुंड, संजय कोळगे, सुरेश बनसोडे, अजिंक्य बोरकर, महेश तवले, डॉ. सागर बोरुडे, सुनील काळे, विपुल शेटीया, विजय गव्हाळे, मयूर बांगरे, केशव नागरगोजे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, सुमित लोंढे, जितू गंभीर, गोरख पडोळे, संग्राम रासकर, जय भोसले, किसन भिंगारदिवे आदी उपस्थित होते. अहिल्यानगरसह राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हतबल झाला असून सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातून अश्रू अनावर झाले आहेत. अजित दादा आणि अहिल्यानगर शहर यांचे अतूट नाते आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून घडले होते. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, “शहराच्या इतिहासात एवढा मोठा निधी कधीही मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून स्वर्गीय अजित दादा पवार यांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला. त्यांनी नेहमीच दर्जेदार विकासकामांकडे लक्ष दिले. वयाच्या ७०व्या वर्षी दादांनी मला न्याय देत सर्वसामान्य कार्यकर्त्याला पारनेर मतदारसंघाचा आमदार केले.

अहिल्यानगर शहर हे अजित दादा यांच्या विचाराचे आहे. माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील म्हणाले, “स्वर्गीय अजित दादांनी सर्वात जास्त नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांना न्याय आणि प्रेम दिले, म्हणूनच विकासाची कामे मार्गी लागली. दादांनी आपल्यावर टाकलेली जबाबदारी आपण सर्वांनी पार पाडायची आहे. माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले, “माझ्या तीस-पस्तीस वर्षांच्या राजकारणाच्या कार्यकाळात कधीही एवढा मोठा निधी मिळाला नव्हता. तो निधी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून अजित दादांनी अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी दिला.

# आत्महत्येची धक्कादायक घटना

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव शहरातील जिल्हा परिषद उपअभियंता, बांधकाम उपविभाग कार्यालयात आज शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी एक खळबळजनक व धक्कादायक घटना उघडकीस आली. कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर बोलूरे पूर्ण नाव अद्याप स्पष्ट झाले नाही या कर्मचाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कार्यालय जुनी पंचायत समिती इमारत, नायगाव येथे कार्यरत आहे. बोलूरे हे लोहा तालुक्यातील लांडगेवाडी येथील रहिवासी असून सध्या ते नायगाव शहरात वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, सकाळी कार्यालयाच्या खालच्या प्रवेशद्वाराला कुलूप लावलेले असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले.

# आदिम संस्कृतीचे खरे आपणच पाईक व रक्षक आहोत

- प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे
- अ‍ॅड.एम.एन.देशमुख महाविद्यालयात आदिवासी संस्कृती ओळख व जतन तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन.

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



आपली आदिम संस्कृती ही जगात सर्वात प्राचीन मात्र पुढारलेली संस्कृती आहे, आपल्या संस्कृतीने नेहमीच मानवतेची व परमार्थाची शिकवण दिली आहे. या आदिम संस्कृतीचे खरे आपणच पाईक व रक्षक आहोत आणि ती संस्कृती टिकून धरण्याचे काम आदिवासी तरुण-तरुणींनी नेटाने करावे. हजारो वर्षाची आदीम संस्कृती लयास गेली तर येणारी भावी पिढी आपणास माफ करणार नाही, असे प्रतिपादन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर च्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी व्यक्त केले. त्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व अ‍ॅड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'आदिवासी संस्कृती ओळख व जतन' या दोन दिवसीय तालुकास्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. सदर कार्यशाळे प्रसंगी अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ सुनील घणकुटे यांनी जिल्ह्यातील आणि महाराष्ट्रातील आदिवासी वंचित क्रांतिकारकांचा इतिहास आपण लिहून तो समाजापुढे धाडसाने मांडण्याचे कार्य करावे असे सांगितले. तर आदिवासी भागाचे भूषण रानकवी तुकारामजी धांडे यांनी रानकविता आपल्या आदिवासी ठाकरी शैलीत सादर केल्या.

# अजितदादा यांना सोमवारी सर्वपक्षीय श्रद्धांजली

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचा आधारवड, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. नामदार स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली सर्वपक्षीय शोकसभा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आली असून ही शोकसभा उद्या रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार होती. मात्र, काही अपरिहार्य कारणांमुळे आता ही शोकसभा सोमवार, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा बँक सभागृह, पारनेर येथेच आयोजित करण्यात आली आलेची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी सांगितले. या शोकसभेसाठी पारनेर तालुक्यातील सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन आमदार काशिनाथ दाते सर यांनी केले आहे. तालुक्याच्या राजकीय, सामाजिक व विकासात्मक वाटचालीत अजितदादा पवार यांचे योगदान अविस्मरणीय असून, त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी ही सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# शिक्षक हेच उद्याचे भवितव्य – डॉ. विश्वासराव आरोटे

## पाडोशी येथील मधुकरराव पिचड विद्यालयात डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वतीने शालेय साहित्य व खाऊचे वाटप!

**एकदरे : (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसुबाई पर्वतरांगेत वसलेल्या, शिवाजी महाराजांचे काही दिवस वास्तव राहिलेल्या विश्रामगड (पट्टाकिल्ला) पायथ्याशी असलेल्या आढळा परिसरातील आदर्श महिला विकास संस्था, संगमनेर संचलित माननीय मधुकरराव पिचड विद्यालय, पाडोशी येथे शालेय साहित्य, वह्या व खाऊचे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक आदिनाथ जाधव, पाडोशी गावचे माजी सरपंच गुलाबराव साबळे यांच्यासह शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाला संबोधित करताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले की, आढळा भागातील ओसाड जमीन आणि पाण्यासाठी होणारी भटकंती संपविण्यासाठी स्वर्गीय मधुकरराव पिचड व अजितदादा पवार यांनी 'धरणे-बंधारे हेच आमचे मंदिरे' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. पाडोशी, सांगवी परिसरात धरणे-बंधारे उभारली गेली, तसेच विश्रामगड (पट्टाकिल्ला) यास नावलौकिक मिळाला.

ग्रामीण भागातील शिक्षणाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी इमारती आहेत पण विद्यार्थी नाहीत, तर काही ठिकाणी विद्यार्थी आहेत पण पुरेशा सुविधा नाहीत. केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर जीवनोपयोगी इतर ज्ञान देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पहिली ते दहावीपर्यंतची शालेय मैत्री आयुष्यभर साथ देणारी असते. विद्यार्थ्यांनी चांगले मित्र तयार करावेत, शिक्षकांचा आदर राखावा, कारण शिक्षक हेच उद्याचे भवितव्य घडवतात.

आपण ज्या शाळेत शिक्षण घेतो, तीच शाळा आपल्याला घडवते. त्यामुळे कमावलेल्या उत्पन्नातून दानधर्म करताना आपल्या शाळेला प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. ही शाळा म्हणजे ज्ञानमंदिर असून येथेच लक्ष्मी, सरस्वती, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांसारखे विचार घडत असतात. आजच्या स्पर्धेच्या युगात बहुआयामी, सक्षम विद्यार्थी घडवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे व्यवस्थापक संजय फुलसुंदर, प्रतिनिधी बाजीराव भांगरे, मुख्याध्यापक आदिनाथ जाधव, सहशिक्षक विठ्ठल बारामते, भीमा दिघे, अर्चना सातपुते, शाळेचे कर्मचारी नामदेव साबळे, संजय रेवगडे, शिवराज फटांगरे, माजी सरपंच गुलाबराव साबळे तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाले. त्यांना सर्व पक्षीय मान्यवर व पदाधिकाऱ्यांकडून शंकराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या शोकसभेस सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी व स्व.अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेनी उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्षीय शहर जिल्हाध्यक्षांनी संयुक्तरित्या करण्यात आले होते. या शोकसभेत माजी मंत्री कमलकिशोर कदम, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डॉ.माधवराव पाटील किन्हाळकर, नांदेड लोकसभेचे खासदार रवींद्र चव्हाण, आ आनंद पाटील बोंढारकर, हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, सुरेशदादा गायकवाड, प्रा.यशपाल भिंगे, प्रवीण पाटील चिखलीकर, बबनराव बारसे, प्रवीण साले, राजेश पावडे, माजी महापौर अब्दुल सत्तार, हर्षद शहा, वंचित आघाडीचे फारूख अहमद, शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, माजी महापौर सौ.जयश्रीताई पावडे, प्रशांत इंगोले, मराठा सेवा संघाचे श्याम पाटील वडजे, छावा संघटनेच्या वतीने दशरथ पाटील कपाटे, शिवसेनेच्या माजी नगरसेविका सौ.अर्पणाताई नेरलकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा आ मोहनराव हंबर्डे, अविनाशराव घाटे . सुभाषराव साबणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावनगावकर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्याध्यक्ष माधव पावडे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण यांच्यासह विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.




# किनवट–पिंपळगाव (की) जुना गाडी रस्ता खुला करण्यासाठी प्रशासनाची स्थळ पाहणी

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट ते पिंपळगाव (की) या जुन्या गाडी रस्त्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून हा रस्ता पूर्ववत व सुरळीत करण्याच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. अनेक वर्षांपासून वापरात असलेला हा पारंपरिक मार्ग अडथळ्यांमुळे बंद पडल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या स्थळ पाहणीसाठी प्रशासनाच्या वतीने मंडळ अधिकारी लाठकर, तलाठी फड व शुभम जिल्हेवाड उपस्थित होते. त्यांनी संपूर्ण मार्गाची पाहणी करून वस्तुस्थितीची माहिती घेतली व शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या. दरम्यान, हा रस्ता पुन्हा खुला व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या शेतकरी व नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष देवराव गोनेवार, अनिल नेम्मानिवार, अविनाश नेम्मानिवार, व्यंकट इटकेपेल्लीवार, प्रभाकर नेम्मानिवार, प्रमोद जोनपेलिवार यांच्यासह पत्रकार मुकुंद नेम्मानिवार व इतर ग्रामस्थ सहभागी झाले होते. या जुन्या गाडी रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी जाणे-येणे सुलभ होणार असून वाहतूक खर्चात बचत होईल. तसेच शेतीमाल वाहतुकीस मोठी मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी हा रस्ता ऐतिहासिक असून पूर्वापार वापरात असल्याचे नमूद करत तो तातडीने सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली. प्रशासनाने पाहणीदरम्यान आवश्यक ते बदल, सुधारणा व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या मार्गामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ होणार असल्याने लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिक्षक तुकाराम कारागीर यांना सेवापूर्ती निरोप

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



कंधार येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दिग्रस (बु) येथील विज्ञान विषयाचे शिक्षक तुकाराम कारागीर यांना शनिवारी (ता.३१) सेवापूर्ती निमित्त निरोप देण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या वतीने आशीर्वाद गार्डन दिग्रस येथील मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे, शालेय समितीचे अध्यक्ष विश्वंभर पाटील, शिवसेना तालुका प्रमुख परमेश्वर जाधव,विद्यालयाचे मुख्याध्यापक एस,एस,बोडावार, प्रर्यवेक्षक बी.डी.होनरावसह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्याप बोडावर यांनी प्रास्ताविकात कारागीर यांच्या कार्याचा आढावा घेतला. संस्थेचे सचिव प्रा.धोंडगे म्हणाले की, तुकाराम कारागीर यांनी गावकऱ्यासह विद्यार्थ्यांची मने जिंकली आणि ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थी घडवून आपल्या विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांच्या जीवन-घडणातील वैज्ञानिक शब्दाचा कारागीर,"तुकाराम कारागीर" म्हणून सेवा केली. इतकेच नाही तर त्यांनी आपल्या मुलांबरोबर मुलींनाही उच्च शिक्षण देऊन इंजिनियर बनविले. या कार्याबद्दल त्यांनी कारागीर गुरुजींचे अभिनंदन केले.

कारागीर गुरुजींनी तब्बल 30 वर्ष कुरुळा,कंधार आणि दिग्रस येथे आपली सेवा बजावली आहे. परिसरातील आजी माजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करत सेवापूर्तीच्या पुढील आयुष्यासाठी सदिच्छा दिल्या. सत्काराला उत्तर देताना कारागीर गुरुजींनी संस्थेचे संस्थापक दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे, माजी आमदार तथा संस्थेचे अध्यक्ष भाई गुरुनाथ कुरुडे आणि धोंडगे परिवाराने मला संस्थेत शिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. होनराव गुरुजींनी सूत्रसंचलन करून उपस्थितांचे आभार मानले.

# नगर तालुक्यात जमिनीच्या वादातून वृध्दावर हल्ला

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

जमिनीच्या वादातून एका वृध्द शेतकऱ्याला लाकडी दांडक्याने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना निंबोडी (ता. अहिल्यानगर) शिवारात घडली आहे. राधाकिसन बळवंत भिंगारदिवे (वय-५७, रा. फर्याबाग, अहिल्यानगर- सोलापूर रस्ता) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सहा जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागेश चंदर भिंगारदिवे, संतोष चंदर भिंगारदिवे, संतोष भिंगारदेवेची पत्नी व दोन मुले आणि एक अनोळखीविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी भिंगारदिवे यांची निंबोडी शिवारात शेतजमीन आहे.

# विष्णुपूरी ग्रा पं च्या वतीने पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन आलेल्या सरपंच व अधिकारी यांचे उत्साहात स्वागत

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन आलेल्या एक हजार सरपंच व अधिकारी यांचे विष्णुपुरी ग्रामपंचायत कार्यालय, काळेश्वर मंदिर समिती व जिल्हा परिषद शाळा विष्णुपुरी यांच्या वतीने स्वागत करण्यात आले यावेळी ग्रामपंचायत कार्यालय,जिल्हा परिषद शाळेसह काळेश्वर मंदिर दर्शन व पशुसंवर्धन ईमारत पाहणी केली. दि ३१ जानेवारी रोजी पंजाब राज्यातील विविध जिल्ह्यातुन एक हजार सरपंच नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील ग्रामपंचायत व पंचायत समिती भेटी देऊन महाराष्ट्रातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायत व महिला सक्षमीकरण ग्रामपंचायत भेटी देऊन महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण कामाची माहिती व अभ्यास करून, अनेक विषयाची आदान प्रदान करून अभ्यास पूर्ण माहिती घेतली. यावेळी वसंत राजुरकर संत्र संचालन यशादा पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि २९ ते 1 फेब्रुवारी चार दिवस अभ्यास दौरा, नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी,तुप्पा ,पांगरी ,मार्कड येथे भेट देऊन विविध विकासकामे पाहणी केली व ग्रामस्थ यांच्याशी चर्चा केली. यावेळी विष्णुपुरी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी यांनी लेझीम पथकाच्या सादरीकरणाने उत्साहात स्वागत केले यावेळी डॉ.बाबा हरजिंदरसिंग यांची प्रामुख्याने उपस्थित होती,तर विष्णुपुरी ग्रामपंचायत येथे सरपंच सौ.संध्या विलास हंबर्डे व उपसरपंच सौ अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांनी व ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे यांनी स्वागत केले. यावेळी पथकाला शासनाच्या वतीने माहिती देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी विठ्ठल सुर्यवंशी, रमेश कदम,संजय कानोडे, वर्षा पाटील, यांच्या सह नियुक्ती केलेल्या अधिकारी यांनी सविस्तर मार्गदर्शन करून माहिती दिली. यावेळी काळेश्वर विष्णुपुरी समिती पदाधिकारी शंकरराव हंबर्डे,धारोजी हंबर्डे, उत्तमराव हंबर्डे,बालाजी हंबर्डे, प्रभाकर हंबर्डे,यांच्या सह माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, सरपंच प्रतिनिधी राजु हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे ,मुख्याध्यापक सौ.ऊज्वला हंबर्डे,सरपंच सौ.संध्या हंबर्डे,ऊपसरपंच अर्चना हंबर्डे व ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह जेष्ठ नागरिक ,ग्रामपंचायत कर्मचारी ऊग्रेसन हंबर्डे,संतोष हंबर्डे,काळबा कंधारे,कालीदास बारसे, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे यांनी सहकार्य केले. सुत्रसंचलन खदीर व आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव यांनी केले.

# यमुना प्रतिष्ठान आयोजित स्मृति व्याख्यान "चला कुटुंब जपुया

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**




मुदखेड येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक कै. गणपतराव उर्फ बापूसाहेब मेगदे (गुरुजी) यांच्या १३व्या पुण्यस्मृती दिन निमित्ताने मेगदे परिवाराच्या ज्ञानदायी व सामाज जिवन उन्नत करणाऱ्या विषयावर गत तेरा वर्षापासून विविध क्षेत्रातील तज्ञाचे व्याख्यान व सन्मानीय व्यक्तींना पुरस्कार दिला जातो. त्या निमित्ताने

सोमवार, २ फेबुवारी रोजी कुसुम सभागृह व्हीआयपी रोड नांदेड येथे, सायंकाळी ६:३० वाजता "चला कुटुंब जपुया " या स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या विद्यार्थ्यांचे सामाजिक जीवन उन्नत करण्यासाठी अथक प्रयत्न करणारे आमचे वडील कै.गणपतराव उर्फ बापूसाहेब मेगदे (गुरुजी) यांच्या पुण्यतिथीनिमित्त २ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे .

कै. गणपतराव मेगदे (गुरुजी ) यांच्या साधेपणा च्या व शिस्तबद्ध,अनुशासन प्रिय स्वभावाचा अनुभव मुदखेड व परिसरातील अनेक नागरिकासह त्यांच्या विद्यार्थ्यानी घेतला आहे त्यांच्या ज्ञानदायी योगदानाची स्मृती या कार्यक्रमातून व्हावी व त्यांचे जीवन सतत आरोग्य सेवा आणि सामाजिक सेवेच्या कार्यासाठी समर्पित केले. त्या ऋणानुबंधातून पुढील मान्यवराना या सन्मानीत करण्यात येणार आहे

डॉ. जयश्री धनाजी देशमुख यांना मातोश्री कै. श्रीमती. शकुंतलाबाई गणपतराव मेगदे स्मृती सेवा गौरव पुरस्कार, तसेच अविरत समाजसेवा आणि धार्मिक कार्यासाठी समर्पित जीवन, प्रित्यर्थ धर्मभूषण दिलीप सिंह ठाकूर यांना कै. गणपतराव मेगदे (गुरुजी) स्मृती सेवा गौरव पुरस्कार, प्रत्येक शाल, श्रीफळ , स्मृतिचिन्ह आणि रोख अकरा हजार राशी देवून यमुना प्रतिष्ठान कडून सन्मानित केले जातील. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, सुनील वेदपाठक (मुख्य जिल्हा आणि सत्र न्यायाधीश नांदेड) प्रसिद्ध वक्ते माननीय . प्रा. युवराज पाटील (प्रसिद्ध साहित्यिक आणि वक्ते) "चला कुटुंब जपुया "यावर विचार प्रकट करणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती ॲड. उमेश मेगदे (अध्यक्ष) रमेश मेगदे (सचिव)" यमुना प्रतिष्ठान "मुदखेड,जि. नांदेड आणि संपूर्ण मेगदे कुटुंबीय यांनी या व्याख्यानाचा लाभ घेण्याची विनंती केली आहे.

# ‘तो’ ठेकेदार स्वतःला समजतोय ‘आरटीओ’ ‘ऑफिसर’...!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

शहर आणि परिसरात कुठेही लावण्यात आलेली दुचाकी वाहनं जप्त करून त्या वाहनांच्या मालकांवर दंडात्मक कारवाई करणं हे खरं तर शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या (ट्रॅफिक कंट्रोल) पोलिसांचं काम आहे. संशयास्पद वाहनांची कागदपत्रं (आर.सी. बुक वैगरे) तपासण्याचं आरटीओच्या अधिकाऱ्यांचं काम आहे. मात्र अहिल्यानगर महापालिकेने नेमलेल्या एका ठेकेदार कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अहिल्यानगर शहर आणि परिसरातल्या वाहनधारकांच्या तर अक्षरशः नाकात दम आणला आहे. घाईगडबडीत असलेल्या वाहन धारकाने कुठेही वाहन लावलं, की त्यावर पाळत ठेवून ते वाहन जप्त करत संबंधित वाहनधारकाकडे ट्रॅफिक पोलीस किंवा आरटीओ अधिकाऱ्यांच्या थाटात वाहनाची कागदपत्रं मागण्याचा सपाटा या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी लावला आहे.



# जिल्हा व सत्र न्यायालय किनवट येथे लवकर कार्यान्वित व्हावे

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

- **वकील संघाची आमदार भिमराव केराम यांच्याकडे वरिष्ठ पातळीवरून पाठपुरावा करण्याची विनंती**

आ. भिमराव केराम यांची किनवट वकील संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी (दि.३०) रोजी भेट घेतली. यावेळी किनवट येथे प्रस्तावित जिल्हा व सत्र न्यायालय लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे, यासाठी राज्य शासन स्तरावर मंत्रालयात प्रभावी पाठपुरावा करावा, अशी विनंती करण्यात आली. या भेटीदरम्यान न्यायालयीन सुविधांचा विस्तार, किनवट तालुक्यातील वाढती लोकसंख्या, न्यायप्रलंबित प्रकरणांची संख्या व नागरिकांना न्याय मिळण्यात होणारा विलंब या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्हा व सत्र न्यायालय सुरू झाल्यास किनवट व परिसरातील नागरिकांना नांदेड येथे जाण्याची अडचण दूर होऊन न्यायप्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान होईल, अशी भूमिका वकील संघाने मांडली. यावेळी किनवट वकील संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर मुनेश्वर, ॲड. टेकसिंग चव्हाण,ॲड. दिलीप काळे, ॲड. सुरेश मुसळे, ॲड. सम्राट सर्पे, ॲड.विलास सुर्यवंशी,ॲड शिरपरे, ॲड. सचिन गिमेकार, ॲड.संकेत राठोड यांच्यासह इतर ही वकील उपस्थित होते. आमदार भिमराव केराम यांनी वकील संघाच्या मागणीची दखल घेत, किनवट येथे जिल्हा व सत्र न्यायालय सुरू होण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. न्यायव्यवस्था बळकटीसाठी व सामान्य नागरिकांच्या हितासाठी हा विषय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# 'रस्ता सुरक्षा सप्ताह' अभियानांतर्गत विशेष व्याख्यानाच्या आयोजन

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**



राष्ट्रीय सेवा योजना विभाग यशवंत महाविद्यालयातर्फे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. शिंदे हे होते तर प्रमुख व्याख्याते म्हणून विजय पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक महामार्ग पोलीस नांदेड हे होते आपल्या व्याख्याना दरम्यान पाटील यांनी दरवर्षी होणाऱ्या अपघातांविषयी आकडेवारी देताना त्यांच्या गंभीरतेबद्दल जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला वाहतुकीचे नियम किती महत्त्वाचे आहेत व ते कसं जीव वाचू शकतात या संदर्भात त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले या कार्यक्रमादरम्यान रस्ता सुरक्षा या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली यामध्ये कु. कोमल कागदेवाड ही विद्यार्थिनी प्रथम आली, विनायक धनवे हा विद्यार्थी द्वितीय तर पूजा घुले ही विद्यार्थिनी तृतीय आलेली आहे राष्ट्रीय महामार्ग पोलीस यांच्या वतीने विजेत्यांना हेल्मेट देण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कोमल कागदेवाड यांनी केले तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कैलाश इंगोले यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजरत्न सोनटक्के प्रा. राजश्री भोपळे तसेच असंख्य स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# आयसीएमएआयचे देशाच्या आर्थिक सक्षमीकरणात महत्त्वपूर्ण योगदान

**पुणे: (समर्थ गांवकरी)**




काही वर्षांपूर्वीपर्यंत कॉस्ट अकाउंटंटचे कार्य हे कंपन्यांचे आर्थिक ऑडिट करणे आणि फायनान्शियल अकाउंटिंगपुरतेच मर्यादित होते. त्यामुळे या कामाला कंपन्यांच्या बॅक ऑफिस स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले होते. मात्र बदलत्या काळात दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) मुळे या क्षेत्राचा व्याप आणि महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. आज देशातील लाखो तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून देशाच्या आर्थिक उलाढालीत सुमारे पन्नास हजार कोटी रुपयांपर्यंतचे योगदान ICMAI मुळे शक्य झाले आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक सक्षमीकरणात ICMAI चे मोठे योगदान असून ‘विकसित भारत’ घडवण्यात संस्थेचा महत्त्वाचा वाटा असेल, असे प्रतिपादन रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष व चीफ फायनान्शियल ऑफिसर रजनीश जैन यांनी केले.

दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICMAI) यांच्या वतीने पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या “RISE इंडिया लीडरशिप समिट” च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ICMAI चे करिअर काऊन्सेलिंग अँड प्लेसमेंट कमिटीचे अध्यक्ष CMA विनय रंजन, ICMAI चे उपाध्यक्ष नीरज जोशी, माजी अध्यक्ष बी.बी. नायक, CMA चैतन्य मोहरीर (सचिव – ICMAI-WIRC), CMA श्रीकांत इप्पलपल्ली (अध्यक्ष – ICMAI पुणे चॅप्टर) आदी मान्यवर उपस्थित होते.

रजनीश जैन म्हणाले की, ICMAI चे स्वरूप, कार्य आणि जबाबदाऱ्या काळानुसार बदलत आहेत. आज कॉस्ट अकाउंटंट्सचा कंपन्यांच्या प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला असून ICMAI ही देशाच्या आर्थिक विकासाला सकारात्मक दिशा देणारी संस्था ठरत आहे. उद्योग आणि ICMAI यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास केवळ कंपन्यांचाच नव्हे तर देशाच्या आर्थिक विकासालाही अधिक गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

CMA श्रीकांत इप्पलपल्ली म्हणाले की, तंत्रज्ञानासोबतच कंपन्या आणि व्यावसायिकांच्या गरजा वेगाने बदलत आहेत. आज देशात कॉस्ट अकाउंटंट्सची कमतरता जाणवत असून व्यवसायांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा प्रकारच्या परिषदांची अधिक गरज आहे.

CMA विनय रंजन यांनी सांगितले की, काही वर्षांपूर्वीपर्यंत भारताची ओळख पाश्चिमात्य कंपन्यांसाठी बॅक ऑफिस सेवा पुरवणारा देश अशी होती. मात्र आता ही प्रतिमा बदलत असून ICMAI आणि कॉस्ट अकाउंटंट्सचा देशाच्या आर्थिक उलाढालीत सुमारे दोन टक्के वाटा निर्माण झाला आहे. ICMAI मुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत असून 2047 पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टात संस्थेचा मोलाचा वाटा असेल. देशाची अर्थव्यवस्था 30 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

बी.बी. नायक म्हणाले की, ICMAI चा मुख्य उद्देश हा व्यवसायवृद्धीसोबतच कंपन्या आणि व्यावसायिकांमध्ये गुणात्मक बदल घडवणे हा आहे. रजनीश जैन यांनी रिलायन्स जिओमध्ये घडवलेले सकारात्मक बदल तरुणांनी आणि कॉस्ट अकाउंट्सनी आदर्श म्हणून घ्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

नीरज जोशी यांनी स्पष्ट केले की, बदलत्या काळानुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्यात येत असून गुणवत्तापूर्ण कॉस्ट अकाउंटंट्स घडवणे ही काळाची गरज आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात तरुणांसमोरील आव्हाने लक्षात घेऊन ICMAI नव्या अभ्यासक्रमांची आखणी करत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिया चौधरी यांनी केले. CMA श्रीकांत इप्पलपल्ली यांनी प्रास्ताविक केले तर CMA चैतन्य मोहरीर यांनी आभार मानले.

# ब्राम्हणवाडा–बोटा रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम निकृष्ट

## ग्रामस्थांचा संताप, काम बंद!



**ब्राम्हणवाडा : (समर्थ गांवकरी)**

ब्राम्हणवाडा–बोटा रस्त्यावर सध्या सुरू असलेले खड्डे बुजवण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा यांच्याकडे केली आहे. या कामाच्या दर्जाबाबत ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर संबंधित अधिकारी व कामावरील सुपरवायझर कडून उर्मट आणि अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कामातील त्रुटी दाखवून दिल्यानंतरही सुपरवायझरने "हे काम निकृष्ट नाही. आमचे काम निकृष्ट म्हणत असाल तर आम्ही काम बंद करून निघून जातो," अशी उर्मट भाषा वापरल्याचे सांगण्यात आले. तसेच कामगार व अधिकारी ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार नसल्यामुळे वातावरण तणावपूर्ण बनले. यानंतर ग्रामस्थांनी पत्रकार संजय गायकर यांच्याशी संपर्क साधला. पत्रकारांनी प्रत्यक्ष स्थळी पाहणी केली असता प्रथमदर्शनीच कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे स्पष्ट दिसून आले. त्यानंतर ग्रामपंचायत प्रशासनाला याची माहिती देण्यात आली.

उपसरपंच सुभाष गायकर व ग्रामपंचायत सदस्य शिवाजी आरोटे यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली असता हे काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले. उपसरपंचांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून कामातील दोष स्पष्टपणे मांडले. मात्र, यावेळी अधिकाऱ्यांनी "आम्ही अशा छोट्या-मोठ्या कामांकडे लक्ष देत बसायचे का?" अशी उर्मट भाषा वापरल्याचा आरोप करण्यात आला. "जर अधिकारी लोकप्रतिनिधींशीच नीट बोलत नसतील, तर सर्वसामान्य नागरिकांशी त्यांची वागणूक कशी असेल?" असा सवाल यावेळी उपस्थित झाला. काम चांगल्या प्रतीचे न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा उपसरपंच सुभाष गायकर यांनी दिला आहे. दरम्यान, ग्रामस्थांच्या तीव्र आक्षेपानंतर सध्या हे काम तात्पुरते बंद करण्यात आले असून प्रशासनाकडून पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेत दिव्यातून निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक अँड. आदेश भगत यांचा ठाणे जिल्हा सत्र न्यायालयात, ठाणे जिल्हा वकील संघटनेतर्फे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी बार काऊंसिल महाराष्ट्र अँड गोवा चे मा.चेअरमन ज्येष्ठ विधीतज्ञ जी.बी. चव्हाण , ठाणे बार असोसिएशनचे अध्यक्ष अप्पा कदम , ज्येष्ठ वकील पी.बी.भोसले यांनी नगरसेवक अँड. आदेश भगत यांचं अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ॲड. निलेश आंधळे यांची निवड

राजगुरुनगर (स. गांवकरी) : खेड तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ॲड.निलेश बाळासाहेब आंधळे, तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून नाजीम इनामदार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष संजय शेटे होते. खेड तालुका पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा राजगुरूनगर येथील पुणे नाशिक महामार्गावरील शासकीय विश्रामगृहात मंगळवारी (ता.२६) पार पडली. ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष - ॲड.निलेश बाळासाहेब आंधळे, उपाध्यक्ष - आदेश भोजने, अतुल भालेराव, कार्याध्यक्ष - इसाक मुलाणी, सचिव - किरण खुडे, खजिनदार - प्रभाकर जाधव, सहसचिव - रोहिदास होले, प्रसिद्धी प्रमुख - नाजिम इनामदार, कायदेशीर सल्लागार - ॲड. सोमनाथ नवले, सल्लागार - बाळासाहेब सांडभोर, सुनील थिगळे, विद्याधर साळवे, वनिता कोरे, कार्यकारिणी सदस्य - महेंद्र शिंदे, राजेंद्र लोथे, दत्ता भालेराव, रोहिदास गाडगे, रामचंद्र सोनवणे, संजय शेटे, सदाशिव अमराळे, एम.डी.पाखरे, किशोर गिलबिले, सुभाष लोहोट.

### माऊली प्रतिष्ठान आयोजित दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचा उत्साहात शुभारंभ –

वडाळा महादेव (स. गांवकरी) : शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी हरेगाव येथे माऊली प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दोन दिवसीय भव्य क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी श्री. अनिल अण्णा भनगडे, दिलीप भाऊ त्रिभुवन, रमेश भाऊ भालेराव, राजू भाऊ हिवाळे, काशिनाथ काका जगताप, हरिभाऊ मढीकर व बंडा भाई मणियार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे व त्यांनी दिलेल्या शुभेच्छांमुळे या स्पर्धेला विशेष उंची प्राप्त झाली. उद्घाटन सामन्यापासूनच खेळाडूंमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला असून, मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या प्रेक्षकांनी खेळाडूंना जोरदार प्रतिसाद दिला. आयोजक समितीच्या नियोजनबद्ध मेहनतीमुळे हरेगावमधील ही क्रिकेट स्पर्धा तालुक्यात लक्षवेधी ठरत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून तरुण व लहान मुलांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवून खेळाकडे व सकारात्मक मार्गाकडे वळवण्याचा उद्देश असल्याचे गिरीश लक्ष्मण परदेशी (ग्रामपंचायत सदस्य उंदीरगाव)यांनी सांगितले. तसेच पुढील काळात याहीपेक्षा अधिक भव्य-दिव्य आणि व्यापक स्वरूपाच्या क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक समितीमध्ये पास्टर समीर आल्हाट, संदीप धनेधर, योगेश शिरसाठ मेजर, विशाल देवरे दाजी, सचिन शिंदे सर, शरद नागरगोजे सर, सौरभ कुलकर्णी, उमा भाऊ गायकवाड, पंकज थोरात, किरण धनेधर, किरण झाल्टे, सागर कुलथे, सागर चक्रनारायण, संकेत गायकवाड, किशोर मकासरे, अनंत वाहूळ व सोमा आगे यांनी मोलाचे योगदान दिले. ही क्रिकेट स्पर्धा हरेगावच्या क्रीडा क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण करेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.




### वारस नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/फौजदारी / वारस दाखला/०३/२०२६ अकोले दि. ३०/०१/२०२६

श्रीम. पुष्पा मारुती तिकांडे, रा. टाकळी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर यांचे पती कै. मारुती काशिनाथ तिकांडे दि. ११/०७/२०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय ठाणे येथे मयत झाले. सदर मयत व्यक्ती हे ठाणे परिवहण सेवा ठाणे महानगरपालिका प्रशासकीय भवन मार्ग क्र. २७ व ३४ वागळे आगार वागळे इस्टेट ठाणे (पं) येथे ड्रायव्हर या पदावर कार्यरत होते. मयत व्यक्तीच्या वारसांना शासनाकडून देय रक्कमा मिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असुन त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अक्र. | वारसाचे नाव | वय वर्ष | नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. पुष्पा मारुती तिकांडे | ५८ | पत्नी |
| २ | श्रीम. सुनंदा मारुती तिकांडे | ४४ | पत्नी |
| ३ | विकास मारुती तिकांडे | २६ | मुलगा |
| ४ | देविदास मारुती तिकांडे | २७ | मुलगा |

या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वारस प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह लेखी स्वरुपात या जाहीर प्रकटनाच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधितांस वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात येईल.

तहसिलदार, अकोले


# विद्यार्थ्यांनी साधला जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद

## परदेशातील उच्च शिक्षणासाठी ५००हून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



परदेशी शिक्षणासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जीएस ग्लोबल अकॅडमीतर्फे आयोजित जागतिक विद्यापीठांशी थेट संवाद कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भांडारकर रस्त्यावरील संस्थेच्या कॅम्पसमध्ये जागतिक दर्जाच्या विविध विद्यापीठांसोबत थेट संवाद व विद्यार्थी प्रवेश अभियान यशस्वीपणे पार पडले. परदेशातील उच्च शिक्षणासाठी ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य होता. या कार्यक्रमात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी तेथील अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, तसेच परदेशातील करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. पुण्यातील विद्यार्थ्यांमध्ये परदेशी शिक्षणाविषयी वाढती उत्सुकता यामधून दिसून आली. या उपक्रमामुळे जीएस ग्लोबल अकॅडमीचे जागतिक विद्यापीठांशी असलेले नेटवर्क अधिक मजबूत झाले असून, विद्यार्थ्यांना थेट दर्जेदार शिक्षण संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

जीएस ग्लोबल अकॅडमीचे संस्थापक गणेश शिरसाठ बोलताना म्हणाले, "परदेशी शिक्षणासाठी सर्व प्रकारच्या सेवा आणि मार्गदर्शन देणाऱ्या जीएस ग्लोबल अकॅडमीमध्ये 'आयईएलटीएस', 'टोफेल', 'जीआरई', 'जीमॅट', 'सॅट' व 'पीटीई' यांसारख्या आंतरराष्ट्रीय परीक्षांसाठी प्रशिक्षण दिले जाते. सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, मॉक टेस्ट सुविधा, ग्रंथालय व स्वतंत्र अभ्यासिका उपलब्ध करून दिल्या आहेत. जर्मन, फ्रेंच व जापनीज व अन्य परदेशी भाषांचे प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास व सॉफ्ट स्किल्सचे मार्गदर्शन दिले जाते. अनुभवी समुपदेशकांकडून प्रवेशापासून व्हिसा, प्रवास व निवास व्यवस्थेपर्यंत संपूर्ण व वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात येते."

# अनियमितता झाल्याप्रकरणी ४ संचालकांवर कठोर कारवाई

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर येथील वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या कारभारात गंभीर अनियमितता झाल्याचे स्पष्ट होत असून, थकबाकीदार ठरलेल्या चार संचालकांवर सहकार विभागाने कठोर कारवाई केली आहे. सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी पतसंस्थेचे माजी चेअरमन, माजी व्हाइस चेअरमन यांच्यासह चार संचालकांना पुढील पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश दिला आहे. सदर पतसंस्थेत एकूण १७ संचालक असून, त्यापैकी सहा संचालक थकबाकीत गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी संचालक किशोर काळे व सभासद शरद काकडे यांनी दि. २७ मे २०२५ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, सचिन चोरगे, आशिष वेळापुरे व अरविंद पाठक हे संचालक ३१ मार्च २०२५ अखेर थकबाकीदार ठरले होते. सहकारी संस्थेमध्ये कर्जवाटपानंतर वसुली करणे ही संपूर्ण संचालक मंडळाची सामूहिक जबाबदारी असताना, संचालकच थकबाकीत गेल्याने संस्थेच्या आर्थिक शिस्तीवर व हितावर गंभीर परिणाम झाला. सहकारी कायद्यानुसार निवडून आलेला संचालक थकबाकीदार ठरल्यास तो संचालकपदासाठी अपात्र ठरतो. तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी सविस्तर सुनावणी घेतली. त्यानंतर पतसंस्थेचे माजी चेअरमन सचिन चोरगे, माजी व्हाइस चेअरमन आशिष वेळापुरे, अरविंद पाठक व सचिन सुडके या चार संचालकांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याचा आदेश देण्यात आला आहे.

# भारतातील आफ्टरमार्केट व ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाची झेप

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योग धोरणामधील सुधारणा, वाढत्या गुंतवणूका आणि झपाट्याने तंत्रज्ञानाचा अवलंब यासह विकासाच्या नवीन टप्प्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ऑटोमोटिव्ह कॉम्पोनन्ट मॅन्युफॅक्चुरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसीएमए)च्या मते, ऑटो कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल सध्या आर्थिक वर्ष 25 मध्ये 80.2 बिलियन अमेरिकन डॉलर्स आहे, तसेच आज ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट उद्योगाचा महसूल 11.8 बिलियन अमेरिकन डॉलर्स आहे. कॉम्पोनन्ट उद्योगाचा महसूल 2030 पर्यंत 111 ते 200 बिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. स्थानिकीकरणाला चालना मिळण्यासोबत निर्यात संधी वाढत असताना ऑटो कॉम्पोनन्ट व आफ्टरमार्केट उद्योग जागतिक आफ्टरमार्केट यंत्रणांमध्ये विश्वसनीय व स्पर्धात्मक सहयोगी ठरत आहेत. ही पार्श्वभूमी पाहता, मेस्से फ्रँकफर्ट ट्रेड फेअर्स इंडिया व एसीएमएद्वारे आयोजित एसीएमए ऑटोमेकॅनिका न्यू दिल्ली 2026 प्रदर्शन यशोभूमी, इंडिया इंटरनॅशनल कन्वेंशन अँड एक्स्पो सेंटर (आयआयसीसी), द्वारका, दिल्ली येथे 5 ते 7 फेब्रुवारी 2026 पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. मेक इन इंडिया, प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्किम्स आणि एफडीआय सुधारणा यांसारख्या उपक्रमांच्या पाठबळासह ऑटोमोटिव्ह आफ्टरमार्केट व ऑटो कॉम्पोनन्ट्स उद्योग गुंतवणूकदारांचे मुख्यत्वे लक्ष वेधून घेत आहे.

# 'मातीशी नातं' कक्षामुळे शाळा ठरतेय ग्रामविकासाचे केंद्र

- धोत्रे खुर्द जि. प. शाळेतील 'शेतीमाल विक्री' उपक्रमाचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून कौतुक

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रे खुर्द येथे शिक्षकांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या 'मातीशी नातं' या नाविन्यपूर्ण उपक्रमाने शिक्षण क्षेत्रासह ग्रामविकासातही नवा आदर्श निर्माण केला आहे.

या उपक्रमांतर्गत शाळेच्या परिसरात स्वतंत्र 'मातीशी नातं' कक्षाची स्थापना करण्यात आली असून, गावात उत्पादित होणारा शेतीमाल व कडधान्ये थेट विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या अभिनव उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ मिळत असून, स्थानिक व सेंद्रीय उत्पादनांना चालना मिळत आहे. शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता ग्रामविकास व आत्मनिर्भरतेचे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे चित्र या उपक्रमातून दिसून येत आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी या उपक्रमाची दखल घेत शाळेतील शिक्षक सचिन ठाणगे व नंदा चेमटे यांचे विशेष कौतुक केले. शाळा आणि गाव यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा हा उपक्रम असून, तो राज्यातील इतर शाळांसाठी आदर्श ठरेल, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. विद्यार्थ्यांना शेती, कडधान्य उत्पादन, विक्री प्रक्रिया तसेच आर्थिक व्यवहार यांचे प्रत्यक्ष व व्यवहार्य ज्ञान मिळत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृती, आत्मनिर्भरतेची भावना आणि सामाजिक जबाबदारी अधिक बळकट होत आहे. शाळेमध्ये गावात तयार होणारा सेंद्रीय भाजीपाला, गावराण कडधान्ये, ज्वारी, बाजरी, गहू, लोकर, घोंगडी आदी शेतीमाल बाजारपेठेच्या तुलनेत कमी दरात उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उपक्रमाला शेतकरी, पालक व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, शाळेला गावाची आणि गावाला शाळेची मदत मिळत असल्याने हा उपक्रम 'स्थानिक ते राष्ट्रीय' या संकल्पनेला साकार करणारा असून, राज्यातील इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असे मत अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी व्यक्त केले.

एकूणच 'मातीशी नातं' या उपक्रमामुळे शिक्षण, शेती आणि ग्रामविकास यांचा सुंदर संगम साधला जात असून, धोत्रे खुर्दची जि. प. शाळा राज्यासाठी एक आदर्श नमुना ठरत आहे.

# शालेय जीवनात संस्कारांची जोड आवश्यक – वैद्य अनिकेत घोटणकर

## दासनवमी निमित्त समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे उत्साहात आयोजन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




शालेय जीवनात पारंपरिक शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना धार्मिक, संस्कारक्षम विचारांची ओळख करून देणे आणि समाजातील संतांचे विचार समजून सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी हे विचार प्रत्यक्ष जीवनात अंगीकारावेत, यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन गरजेचे आहे. या स्पर्धा म्हणजे समर्थांचा विचार, रामाची भक्ती आणि हनुमानाची व्यक्तिमत्त्वशक्ती यांचा त्रिवेणी संगम असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वैद्य अनिकेत घोटणकर यांनी केले. समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दासनवमी निमित्त दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धासोहळ्याचे उद्घाटन समर्थ विद्या मंदिर (प्राथमिक विभाग), सांगळे गल्ली येथे रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वैद्य अनिकेत घोटणकर, शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे सदस्य सुनील जोशी, संध्याताई कुलकर्णी, मुख्याध्यापक सुनील कानडे, सावेडी प्रशालेच्या प्राचार्या सुद्धा जोशी, मुख्याध्यापक अजय महाजन, धनश्री गुंफेकर यांच्यासह शहरातील विविध शाळांचे शिक्षक, पालक व स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना वैद्य अनिकेत घोटणकर म्हणाले की, समर्थ रामदासांचे विचार हे केवळ धार्मिक नसून ते जीवन घडविणारे आहेत. शिस्त, कष्ट, आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांची बीजे विद्यार्थीदशेतच रोवली गेली पाहिजेत. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर समर्थ विचारांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरते. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला दिशा मिळते. समर्थ विद्या प्रसारक मंडळ गेल्या ५० वर्षांपासून नगर शहरात या स्पर्धांचे सातत्याने आयोजन करत असून या उपक्रमाला दरवर्षी शहरातील विविध शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. यावर्षी निबंध, हस्ताक्षर, चित्रकला, पाठांतर, वक्तृत्व आणि गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून अहिल्यानगर शहरातील विविध शाळांमधील सुमारे ४०० ते ५०० विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत.

आजचे शिक्षण विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे असावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक अजय महाजन यांनी समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, आजचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे असावे, हीच काळाची गरज आहे. समर्थ रामदास स्वामींचे विचार हे विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. शिस्त, परिश्रम, स्वावलंबन, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकी ही मूल्ये समर्थ विचारांतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून निष्ठेने करत आहे.

पुढे ते म्हणाले की, दासनवमी निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. निबंध, वक्तृत्व, चित्रकला, गायन, पाठांतर अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला चालना मिळते. स्पर्धा जिंकणे महत्त्वाचे असले तरी सहभागातून मिळणारा आत्मविश्वास, शिस्त आणि संस्कार हेच खरे यश आहे. पालक, शिक्षक आणि संस्थेच्या सहकार्यामुळेच हा उपक्रम सातत्याने यशस्वीपणे राबवता येत आहे.

शालेय समितीचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार करणारा हा ज्ञानरूपी यज्ञ सर्वांच्या सहकार्याने आजपर्यंत अखंडपणे सुरू आहे आणि भविष्यातही तो अविरतपणे चालू राहील."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनीता पांडव यांनी केले तर आभार प्रदर्शन लीना बंगाळ यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम भक्तिभाव, शिस्त व संस्कारमूल्यांच्या वातावरणात उत्साहात पार पडला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा सखोल आढावा

## अभियानांतर्गत झालेल्या विकासकामांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून कौतुक

**जिल्हा परिषद, ठाणे : (समर्थ गांवकरी)**



आज, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी ग्रामपंचायत अंजूर येथे अचानक भेट देऊन "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा व विकासकामांचा सखोल आढावा घेतला. याप्रसंगी गटविकास अधिकारी (भिवंडी) गोविंद खामकर, ग्रामपंचायत अधिकारी अनिल गणेश कांगणे, सरपंच छाया शाम जनाठे, उपसरपंच हरेश मुरलीधर नाईक, ग्रामपंचायत सदस्य सुकेश डाकी, अविनाश दोडे, योगिता भोईर, ग्रामपंचायत कर्मचारी वृंद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या भेटीदरम्यान अभियानाबाबतची सविस्तर माहिती ग्रामपंचायत अधिकारी अनिल गणेश कांगणे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिली. अभियानाचे मुख्य ७ घटक लक्षात घेऊन प्रत्येक घटकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभियानाच्या कालावधीत ग्रामपंचायत अंजूर येथे राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाधान व्यक्त करत विशेष कौतुक केले.

यावेळी उपस्थित ग्रामपंचायत समिती सदस्यांनी विविध नागरी व विकासात्मक समस्यांकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लक्ष वेधले. स्टेम प्राधिकरणांतर्गत मुख्य माणकोली ते अंजूर दरम्यान जलवाहिनी असून मुख्य रस्त्यालगत असलेल्या एस. एस. अपार्टमेंटमध्ये १२७ मिळकतधारक वास्तव्यास आहेत. मात्र, अंजूर येथील पाण्याच्या टाकीतून त्यांना पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने मुख्य जलवाहिनीवरून टॅपिंग करून पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयासमोरील जागा व घर खरेदी करण्याबाबत परवानगी देण्यात यावी, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी सर्व्हे नं. २२३ मधील ३० गुंठे जागेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर जागा ग्रामपंचायतीला लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावी, अशा सूचना करण्यात आल्या. याशिवाय ग्रामपंचायत अंजूर हद्दीतून जाणाऱ्या मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे गावातील मुलांसाठी असलेले एकमेव क्रिकेट मैदान बाधित झाले आहे. परिणामी आजतागायत मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नसून सर्व्हे नं. २२३ मध्ये क्रीडांगणाची तरतूद करून देण्याची मागणी ग्रामपंचायत समितीने केली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ज्या बाबींमध्ये अधिक गुण मिळू शकतात त्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करून अभियानात जास्तीत जास्त गुण प्राप्त करण्यासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिल्या. तसेच घनकचऱ्याचे योग्य प्रकारे विलगीकरण करून खतनिर्मिती करावी, सुका कचरा रिसायकलिंगसाठी पाठवावा आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी शालेय आजी-माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून लोकसहभागाची चळवळ उभी करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले. यानंतर ग्रामपंचायत अंजूर येथे मंजूर झालेल्या पंचायत प्रशिक्षण केंद्राची (PLC) पाहणी करण्यात आली. पंचायत प्रशिक्षण केंद्राचे सादरीकरण समाधानकारक असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले.

# आता पाण्याविना करा कारची स्वच्छता

- मॅजिक कार्वो इंडिया एलएलपीच्या 'कारवो – वॉटरलेस कार स्पा' (carwo) ॲपचे अभिनेत्री उर्वशी रौतेला यांच्या हस्ते भव्य अनावरण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



पर्यावरण संरक्षण आणि जलसंधारणाच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल उचलत पुण्यातील तरुण उद्योजक साहिल अग्रवाल यांनी पाण्याविना वाहन स्वच्छतेसाठी अत्याधुनिक व इको-फ्रेंडली तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्यांच्या मॅजिक कार्वो इंडिया एलएलपी या कंपनीने विकसित केलेल्या 'कारवो – वॉटरलेस कार स्पा' (carwo) या मोबाइल ॲपचे अभिनेत्री उर्वशी रौतेला यांच्या करकमलांनी भव्य अनावरण करण्यात आले. सध्या पारंपरिक पद्धतीने कार धुतल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होते आणि दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जाते. मात्र 'कारवो' (carwo) च्या वॉटरलेस तंत्रज्ञानामुळे एक थेंबही पाणी न वापरता कार पूर्णपणे सुरक्षित, चमकदार आणि प्रभावीरीत्या स्वच्छ करता येते. या अभिनव उपक्रमामुळे लाखो लिटर पाण्याची बचत होणार असून, जलटंचाईच्या पार्श्वभूमीवर ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. साहिल अग्रवाल व त्यांची बहीण श्रुती अग्रवाल गेल्या दोन वर्षांपासून इको-फ्रेंडली कार केअर आणि क्लिनिंग सोल्यूशन्सच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. आज पुण्यात हजारो समाधानी ग्राहकांनी 'कारवो'च्या सेवांवर आपला विश्वास व्यक्त केला आहे. यासंदर्भात बोलताना साहिल अग्रवाल यांनी सांगितले की, पारंपरिक कार वॉशमुळे अनेक वेळा वाहनाच्या रंगावर परिणाम होतो तसेच पाण्याचे डागही राहतात. याच समस्यांवर उपाय म्हणून वॉटरलेस कार क्लिनिंग तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे.

# 'युपीएससी'मध्ये नीतिशास्त्र विषय आणल्यानंतर टीका झाली



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशातील सर्वांत मोठ्या व तितक्याच महत्त्वाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (युपीएससी) घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षांच्या अभ्यासक्रमामध्ये मी अध्यक्ष असताना अनेक बदल घडवावे लागले. मात्र, जेव्हा या परीक्षेमध्ये नीतिशास्त्र या विषयाचा अंतर्भाव करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यावर चौफेर टीका झाली. तथापि, तत्कालीन सरकार व मंत्रालयाने आयोगावर ठाम विश्वास व्यक्त केल्याने या बदलांची प्रभावी अंमलबजावणी झाली. कालांतराने नीतिशास्त्राचे महत्त्व सर्वांना पटले, असे मत केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (युपीएससी) माजी अध्यक्ष डॉ. डी. पी. अग्रवाल यांनी व्यक्त केले. ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथील स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस (एसआयसीएस) तर्फे नागरी सेवांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित "नागरी सेवा आणि राष्ट्रनिर्मिती" या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. किशोर राजे निंबाळकर, विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रोव्होस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलपती डॉ. मोहित दुबे, स्कूल ऑफ इंडियन सिव्हिल सर्व्हिसेसचे संचालक डॉ. सुजित धर्मपात्रे, स्कूल ऑफ लॉचे अधिष्ठाता डॉ. गोविंद राजपाल आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. अग्रवाल म्हणाले की, नागरी सेवा परीक्षांमध्ये नीतिशास्त्राचा अंतर्भाव करण्यापूर्वी तो विषय माहिती तंत्रज्ञान व व्यवस्थापन संस्था (आयआयटीएम), ग्वाल्हेर येथे समाविष्ट करण्यात आला होता.

# मंचर येथे शोकसभेचे आयोजन

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद मंचर शाखेच्या वतीने शोकसभेचे आयोजन सोमवार दि.२ रोजी दुपारी चार वाजता मंचर नगरपंचायत कार्यालयातील ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहात करण्यात आले आहे. शोकसभेस पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पदाधिकारी राजन लाखे हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक वि.श.महामुनी यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न होणार आहे. तसेच या प्रसंगी मार्गदर्शनासाठी ॲडव्होकेट बाळासाहेब बाणखेले उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

# छावा ट्रेकिंग ग्रुपकडून स्व. अजित पवारांना श्रद्धांजली



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील छावा ट्रेकिंग ग्रुपच्या ५७ मावळ्यांनी शनिवारी महाराष्ट्रातील सर्वात उंच असलेल्या कळसुबाई शिखरावर यशस्वी चढाई करत, राज्याच्या राजकारणात यशाचे शिखर गाठणारे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार तसेच पायलट सौरभ कपूर, शांभवी पाठक, पिंकी विदीप जाधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी "अजित पवार अमर रहे" अशा घोषणा देण्यात आल्या.

बारामतीजवळ झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात स्व. अजित पवार यांचे निधन झाले. त्यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी कळसुबाई शिखर मोहिमेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती छावा ट्रेकिंग ग्रुपचे अध्यक्ष नवनाथ खामकर यांनी दिली. यासाठी नवनाथ दरेकर, राजकुमार इथापे व गोपाळ डांगे यांनी पुढाकार घेतला.

सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी अनिल शिंदे म्हणाले, "स्व. अजित पवार यांनी राजकारणाच्या माध्यमातून गुणवत्तेवर आपली ठाम मोहर उमटवली." नवनाथ दरेकर यांनी सांगितले की, "जलसिंचन, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात त्यांनी अविस्मरणीय कार्य केले."

नवनाथ खामकर म्हणाले, "समाजहितासाठी उभे केलेले भक्कम काम हेच अजितदादांच्या कर्तृत्वाची खरी ओळख आहे."

रेश्मा डांगे यांनी नमूद केले की, "लाडकी बहीण योजनेसाठी निधी कमी पडू न देता त्यांनी महिलांसाठी ठोस निर्णय घेतले."

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार इथापे यांनी केले.

### सहभागी मावळे

नितीन खामकर, मनिषा काकडे, गोपाळ डांगे, संतोष जाधव, विकी शिवले, मारुती साळवे, समिक्षा साळवे, कार्तिक साळवे, सुरेश खामकर, सुषमा साळवे, डॉ. मधू फडतरे, ओंकार बाबर, अनिल गावडे, दत्ता जगताप, सार्थक गावडे, राजवर्धन गावडे, अशोक पांडुळे, साक्षी आहिरे, गायत्री आहिरे, आशा उंडे, वैशाली शिंदे, पूजा जाधव, सविता शिंदे, माधुरी राजगुरू, अशोक तांबे, कुंडलिक शिंदे, दत्ता मांडे, सुजल जगताप, सहदेव खामकर, चेतन भगत, दत्ता हिरवे, संतोष हिरवे, अशोक हिरवे, भाग्यश्री हिरवे, पूनम हिरवे, खंडू हिरवे, प्रशांत वाकडे, शहाजी शिंदे, गणेश होळकर, सागर पवार, विवेक मखरे, अमोल झरेकर, बाळासाहेब.काकडे

# लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादनातून विकासाला नवी चालना

- भारत–युरोपियन युनियन 'मदर ऑफ ऑल डील्स' करारामुळे बाजारपेठ प्रवेश व निर्यातीस ऐतिहासिक गती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

INDIA WOOD

26 फेब्रुवारी ते 2 मार्च 2026 दरम्यान बंगळुरू येथील बेंगळुरू इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटर (BIEC) येथे INDIAWOOD 2026 या जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या या द्वैवार्षिक प्रदर्शनाची ही 26 वी आवृत्ती असून, लाकूड प्रक्रिया, फर्निचर उत्पादन व मॅट्रेस निर्मिती क्षेत्रातील एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद म्हणून INDIAWOOD ओळखली जाते. या प्रदर्शनाला युरोपियन फेडरेशन ऑफ वुडवर्किंग मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स (EUMABOIS) यांचे अधिकृत पाठबळ आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती ठरणाऱ्या INDIAWOOD 2026 मध्ये 50 हून अधिक देशांतील 1,000 पेक्षा जास्त ब्रँड्स सहभागी होणार आहेत. सुमारे 90,000 हून अधिक उद्योग व्यावसायिकांची उपस्थिती अपेक्षित असून, 85,000 चौरस मीटर क्षेत्रफळावर हे प्रदर्शन भरवले जाणार आहे. मागील आवृत्तीच्या तुलनेत सुमारे 15 टक्क्यांची वाढ या प्रदर्शनातून दिसून येते. भारताच्या उत्पादन क्षमतेवरील वाढता जागतिक विश्वास आणि 'विकसित भारत' या दृष्टीकोनाशी सुसंगत अशी ही घडामोड आहे, ज्यामध्ये प्रगत उत्पादन, निर्यात व जागतिक एकात्मता हे प्रमुख विकास चालक आहेत. आगामी प्रदर्शनाबाबत न्युर्नबर्गमेस्से इंडिया यांच्या व्यवस्थापकीय संचालक सोनिया प्रशर यांनी सांगितले, "INDIAWOOD 2026 हे भारतातील लाकूड प्रक्रिया व फर्निचर उत्पादन उद्योगातील वाढता आत्मविश्वास, परिपक्वता आणि जागतिक महत्त्वाकांक्षा यांचे प्रतीक आहे. आतापर्यंतची सर्वात मोठी आवृत्ती म्हणून हे प्रदर्शन भारताला विश्वासार्ह उत्पादन केंद्र व जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचा घटक म्हणून अधिक बळकटी देईल. आंतरराष्ट्रीय सहभागासह तंत्रज्ञान, शाश्वतता आणि कौशल्य विकासावर दिलेला भर हा उद्योग जागतिक स्पर्धेसाठी सज्ज असल्याचे दर्शवतो." धोरणकर्त्यांनी 'मदर ऑफ ऑल डील्स' असे संबोधलेल्या भारत–युरोपियन युनियन मुक्त व्यापार करारामुळे (FTA) भारतीय लाकूड प्रक्रिया व फर्निचर उद्योगासाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. या करारामुळे युरोपियन बाजारपेठांमध्ये सुलभ प्रवेश, बहुतेक व्यापार वस्तूंवरील शुल्कात कपात किंवा रद्दबातल, तसेच इंजिनिअर्ड वुड उत्पादने व घटकांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. प्रगत मशिनरी आणि औद्योगिक इनपुट्सच्या सुलभ उपलब्धतेमुळे नवोन्मेष, निर्यात व आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती मिळणार असून, या सर्व प्रक्रियांमध्ये INDIAWOOD सातत्याने महत्त्वाची भूमिका बजावत आहे. INDIAWOOD 2026 मध्ये कॉम्पॅक्ट दरवाजे व फिटिंग सिस्टिम्सकडे होत असलेल्या संक्रमणावर विशेष भर देण्यात येणार आहे. यामुळे उच्च अचूकतेचे अभियांत्रिकी, कच्च्या मालाचा कार्यक्षम वापर आणि आधुनिक उत्पादन प्रक्रियांशी सुसंगत एकात्मता साधता येते. प्रदर्शनात वुड ग्रेन, व्हिनिअर, रॅटन आणि फॅब्रिक-लुक पृष्ठभाग यांसारख्या निसर्गप्रेरित साहित्यांसह प्रगत सर्फेस तंत्रज्ञान सादर करण्यात येणार आहे.



# काल्याचे किर्तनाचे आयोजन

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपुर तालुक्यातील शिरसगाव इंदिरानगर परिसरातील श्री तुळजाभवानी मंदिरात तृतीय वर्धापन दिनानिमित्ताने दिनांक १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५.३० ते ८ वा काल्याचे किर्तन तसेच समाज प्रबोधन होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविकांनी कार्यक्रमांचा दर्शनाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समिती तसेच श्री राते छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठाण भवानीनगर समस्त ग्रामस्थ शिरसगाव यांनी आवाहन केले आहे.

# फिजिक्सवाला कडून सीबीएसई इयत्ता दहावी विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा उपक्रम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




अग्रगण्य शिक्षण कंपनी फिजिक्सवाला (PW) ने संपूर्ण भारतातील सीबीएसई इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शंका निरसन सहाय्य आणि मॉक प्री-बोर्ड परीक्षांचा विशेष उपक्रम जाहीर केला आहे. २०२६ मध्ये बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रभावी तयारीसाठी आवश्यक मार्गदर्शन आणि तज्ज्ञांचे सहकार्य मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत, पीडब्ल्यूशी नोंदणीकृत असो वा नसो, देशभरातील कोणताही इयत्ता दहावीचा विद्यार्थी मोफत शंका निरसन सेवा घेऊ शकतो. परीक्षेच्या तयारीदरम्यान येणारा ताण कमी करणे आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, यासाठी हा उपक्रम खास डिझाइन करण्यात आला आहे. यासोबतच, फिजिक्सवाला विज्ञान आणि गणित विषयांसाठी ऑफलाइन प्री-बोर्ड (मॉक) परीक्षा देखील आयोजित करणार आहे. या परीक्षा पीडब्ल्यूची विद्यापीठे, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्स अशा प्रत्यक्ष केंद्रांवर घेतल्या जातील. यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या बोर्ड परीक्षेसारखा अनुभव मिळेल, तसेच वेळ व्यवस्थापन, उत्तर लेखन कौशल्य आणि विषयांवरील प्रभुत्व अधिक मजबूत होण्यास मदत होईल. फिजिक्सवाला विद्यापीठ–ऑफलाइनचे सीईओ अंकित गुप्ता म्हणाले, "बोर्ड परीक्षांसारख्या निर्णायक टप्प्यावर विद्यार्थ्यांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय शिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे. अनेकदा एका शंकेचे निरसन न झाल्यामुळेही विद्यार्थ्यांवर मोठा ताण येतो. त्यामुळे आमच्याशी नोंदणीकृत असो वा नसो, प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठ, पाठशाला आणि ट्यूशन सेंटर्सच्या माध्यमातून आवश्यक पाठिंबा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

# सम्यक, करमवीर यांनी पटकावले विजेतेपद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित श्रेयसी नरहर गोडबोले स्मृती १७व्या एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत सम्यक कुलकर्णी आणि करमवीरसिंग यांनी अनुक्रमे १४ वर्षांखालील आणि १० वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकावले.

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कलच्या मान्यतेने ही स्पर्धा भांडारकर रोडवरील साने डेअरी चौक येथील मिलेनियम टॉवर्स येथे झाली.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात सातव्या फेरीअखेर सम्यक कुलकर्णी आणि आयुष माहुरकर यांचे समान सहा गुण झाले. टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने सम्यक अव्वल, तर आयुष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. दहा वर्षांखालील मुलांच्या गटात करमवीरने सात फेऱ्यांअखेर ६.५ गुणांसह विजेतेपद निश्चित केले. विजेत्यांना मोटरस्पोर्ट्स खेळाडू संजय टकले आणि क्रिकेटपटू तेजल हसबनीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी नगरसेवक पुनीत जोशी, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे सचिव निरंजन गोडबोले, विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्टचे कार्याध्यक्ष नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर, क्रीडा समिती अध्यक्ष समीर हाळंदे, वरुण जकातदार, योगेश माळी, महेश माळी, ऋषिकेश आर्य उपस्थित होते. विजेत्यांना रोख पारितोषिक, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

# जिल्हा परिषद शाळेची इमारत कोसळली; सुदैवाने जीवितहानी टळली

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील लोखंडेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची जुनी व जीर्ण इमारत रात्रीच्या सुमारास कोसळली. ही इमारत गेल्या दोन वर्षांपासून धोकादायक घोषित करण्यात आली होती व तिच्या निर्लेखनाचा प्रसप्रशासनाकडे प्रलंबित होता. मंजुरी मिळण्यापूर्वीच इमारत कोसळल्याने परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने ही घटना रात्री घडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच संबंधित प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींनी तातडीने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. उर्वरित धोकादायक भाग त्वरित पाडण्याचे (निर्लेखन) आदेश यावेळी देण्यात आले.

ही शाळा ११ डिसेंबर १९४७ रोजी स्थापन झाली असून, सुरुवातीच्या काळात शाळा मारुती मंदिरात भरत होती. स्थानिक नागरिकांच्या पाठपुराव्यामुळे १९९३ साली शाळेच्या नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यात आले. मात्र कालांतराने या खोल्यांची अवस्था अत्यंत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव गेल्या दोन वर्षांपासून शाळा पुन्हा मारुती मंदिरातच भरवली जात आहे. या शाळेचा निर्लेखन दिनांक6 ऑक्टोंबर 2025 रोजी करण्यात आला होता

दरम्यान, नवीन शाळा इमारतीसाठी बाबाजी किसन लोखंडे व विठ्ठल किसन लोखंडे यांनी ४ गुंठे जागा शाळेस बक्षीस दिली आहे. तथापि, प्रशासकीय दिरंगाईमुळे नवीन इमारतीच्या बांधकामास अद्याप सुरुवात झालेली नाही.

शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष संतोष लोखंडे व सोमनाथ लोखंडे यांनी प्रशासनाच्या दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

"आम्ही ज्या मंदिरात बसून शिक्षण घेतले, आजही आमच्या मुलांना त्याच ठिकाणी शिक्षण घ्यावे लागत आहे, ही खंत आहे. जर शासनाने तातडीने नवीन वर्गखोल्यांना मंजुरी दिली नाही, तर पालक आपल्या पाल्यांसह पंचायत समितीत शाळा भरवतील," असा इशारा त्यांनी दिला.

घटनेनंतर गटविकास अधिकारी राणी फराटे, नगरपरिषद मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटशिक्षण अधिकारी कुसुमकुमारी कानडी, विस्तार अधिकारी सुनीता वाजे, नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, उपनगराध्यक्षा अलका अनभुले, नगरसेवक शहाजी खेतमाळीस, अख्तर शेख, ऋषिकेश बोरुडे, माजी नगरसेवक सतीश मखरे, विकास बोरुडे व पांडुरंग पोटे यांनी शाळेस भेट देत नुकसानीचा आढावा घेतला.

शाळेची इमारत कोसळल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून, यावर शासन कोणती ठोस भूमिका घेते, याकडे पालक, शिक्षक व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

लोखंडेवाडी शाळा इमारत कोसळल्यानंतर तालुक्यातील इतर धोकादायक शाळा इमारतींच्या निर्लेखन प्रस्तावांबाबत गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे विचारणा करण्यात आली असता, त्यांच्याकडे सविस्तर माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. संबंधित कर्मचारी कामानिमित्त 'अहिल्यानगर' येथे गेल्याचे सांगण्यात आले.

शाळा इमारतींच्या सुरक्षिततेसारख्या महत्त्वाच्या विषयावर जबाबदार अधिकाऱ्यांकडे अद्ययावत माहिती नसणे, याबाबत पालक व शिक्षक वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे.

## सहानुभूती, सत्ता-संतुलन आणि लाडकी बहीण : सुनेत्रा पवार कशामुळे ठरल्या उपमुख्यमंत्री पदी पसंतीस!

# दादांनंतर महाराष्ट्राची नवी 'ताई'

- शरद पवार, सुप्रिया सुळे चर्चेत असतानाही सुनेत्रा पवार कशा ठरल्या वरचढ?
- राजकारणातील निर्णायक क्षण : अजित पवारांनंतर सुनेत्रा पवारांकडे सूत्रे!
- वहिनीची ओळख पुसली गेली : महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांचा उदय!





सुनेत्रा पवारांचा सत्तेपर्यंतचा प्रवास!



डॉ. विश्वासराव आरोटे
कळसुबाई शिखरावरून



(समर्थ गांवकरी)

काटेवाडीपासून विद्या प्रतिष्ठानपर्यंत आणि विद्या प्रतिष्ठानपासून थेट संपूर्ण महाराष्ट्रापर्यंत पवार कुटुंबाचा राजकीय प्रवास विस्तारलेला आहे. या प्रवासात "दादा" म्हणून ओळख निर्माण करणारे अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री, पुण्याचे पालकमंत्री, अर्थ खात्यासारखे अत्यंत महत्त्वाचे खाते सांभाळणारे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. संपूर्ण महाराष्ट्रासाठी ते "दादा" होते. मात्र त्यांच्या अचानक झालेल्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी आणि त्या पोकळीवर तोडगा कसा निघाला, याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू आहे.

आजपर्यंत सुनेत्रा पवार यांची ओळख प्रामुख्याने "वहिनी" अशीच होती. त्या थेट सक्रिय राजकारणात नव्हत्या. समाजकारण, लोकसंपर्क, मदतीची भूमिका या माध्यमातून त्या कार्यरत होत्या. मात्र लोकसभेतील पराभवानंतर राज्यसभेवर पाठवून अजित पवारांनी त्यांना सक्रिय राजकारणात आणले. पक्षाच्या कामात त्या हळूहळू लक्ष देऊ लागल्या, तरीही त्यांची ओळख वहिनीपलीकडे फारशी गेलेली नव्हती. पण आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांचे नाव पुढे आले आहे.

अजित पवारांच्या अस्थिविसर्जना नंतर त्याच दिवशी संध्याकाळी सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील, हे जवळपास निश्चित झाले. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांत आणि महायुतीत जयंत पाटील, सुप्रिया सुळे यांच्यासारखी अनुभवी नावे चर्चेत असतानाही अखेरीस सुनेत्रा पवार यांच्यावरच शिक्कामोर्तब का झाले, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

सुनेत्रा पवार वरचढ ठरण्याचं पहिलं आणि सर्वात मोठं कारण म्हणजे सहानुभूती. अजित पवार राज्याच्या राजकारणात पूर्ण ताकदीने सक्रिय होते. त्यांनी कामाचा धडाका लावला होता. अशा स्थितीत अचानक झालेल्या त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. राज्यावर शोककळा पसरली. "अजित पवारांनंतर कोण?" हा प्रश्न लगेच पुढे आला.

ही सहानुभूती कुटुंबातीलच कुणा एकामागे उभी राहणार, हे जवळपास निश्चित होते. त्यामुळे जय पवार, पार्थ पवार यांची नावे चर्चेत आली. मात्र राजकीय अनुभवाचा अभाव आणि त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे पतीच्या निधनाचं दुःख पचवून उभी राहिलेली महिला, या भावनिक घटकामुळे सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी सहानुभूतीची लाट उभी राहिली. अजित पवारांनीच त्यांना राज्यसभेवर पाठवून राजकारणात सक्रिय केल्यामुळे "दादांनंतर कोण?" या प्रश्नाचं उत्तर आपोआप सुनेत्रा पवार ठरल्या.

अजित पवारांच्या अंत्यदर्शनावेळी भरल्या डोळ्यांनी, हात जोडून जनतेकडे पाहणाऱ्या सुनेत्रा पवारांचे दृश्य महाराष्ट्राने पाहिले. त्या क्षणी केवळ राष्ट्रवादीचे कार्यकर्तेच नाही, तर सामान्य जनताही हळहळली. त्यामुळे अनुभवी नेते असूनही अजित पवारांच्या थेट वारसदार म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाला मोठी सहानुभूती मिळाली.

दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे पक्ष शरद पवारांच्या ताब्यात पूर्णपणे जाऊ न देणं. अजित पवारांच्या निधनापूर्वीच दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चा सुरू होत्या. अनेक ठिकाणी एकाच चिन्हावर निवडणुका लढवल्या जात होत्या. जर पूर्ण विलिनीकरण झालं असतं, तर नेतृत्व शरद पवारांकडे शिफ्ट झालं असतं. अजित पवारांच्या नेतृत्वाखाली शरद पवारांचे नेतृत्व नको, अशी भूमिका घेऊन जे आमदार आणि नेते उभे राहिले होते, त्यांच्यासाठी हा मोठा पेच ठरला असता. पुन्हा एकदा राज्यात दादा आणि केंद्रात सुप्रिया सुळे, तर पुढे रोहित पवार यांचं नेतृत्व – अशी रचना झाली असती. यात अजित पवार कुटुंबाचं नेतृत्व बाजूला पडण्याची शक्यता होती.

सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल किंवा अन्य नेत्यांकडे नेतृत्व दिलं असतं, तरीही शरद पवारांना बायपास करणं कठीण ठरलं असतं. त्यामुळे शरद पवारांच्या प्रभावापासून थोडं दूर, पण तरीही पवार कुटुंबातच नेतृत्व राहावं, यासाठी सुनेत्रा पवार हे नाव सर्वांना स्वीकारार्ह ठरलं. तिसरं कारण म्हणजे सरकारसाठी आणि महायुतीसाठी 'लाडकी बहीण' हा राजकीय घटक. लोकसभेतील पराभवानंतर विधानसभेचं आव्हान मोठं होतं. याच काळात 'लाडकी बहीण' योजनेची घोषणा झाली आणि ती गेम चेंजर ठरली. महिलांनी महायुतीला मोठ्या प्रमाणावर मतदान केलं.

या योजनेचा महत्त्वाचा चेहरा अजित पवार होते. ते नसताना आता सरकारमध्ये सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री म्हणून येत असतील, तर महिला केंद्रीत राजकारणाला नवी धार मिळते. दुसऱ्या कोणत्याही महिला नेत्याला ही जबाबदारी दिली असती, तर राजकीय स्पर्धा आणि असुरक्षितता निर्माण झाली असती. पण अजित पवारांच्या पत्नीला नेतृत्व दिल्याने "आम्ही आमच्या लाडक्या बहिणीच्या पाठीशी उभे राहिलो" असा संदेश जातो. हा संदेश विशेषतः भाजप आणि केंद्रीय नेतृत्वासाठी गुडविल निर्माण करणारा आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेली सहानुभूती, पक्षातील सत्ता संतुलन आणि महिला केंद्रीत राजकारण या तिन्ही घटकांच्या संगमामुळे सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रीपदासाठी वरचढ ठरल्या. शरद पवार, सुप्रिया सुळे, तटकरे, पटेल यांच्यासारखी वजनदार नावे असतानाही दीर्घकालीन राजकीय फायद्याच्या दृष्टीने महायुतीसाठी आणि राष्ट्रवादीसाठी सुनेत्रा पवार हा सर्वमान्य चेहरा ठरला.

म्हणूनच वहिनी म्हणून ओळख असलेल्या सुनेत्रा पवार आज महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून पुढे येताना दिसत आहेत.

## 'जाने अनजाने हम मिले'मधील अत्याचारदृश्याचा 'हायवे'शी खास संबंध

पुणे : (समर्थ गांवकरी)



झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) मुख्य भूमिकेत आहेत. या मालिकेत अलीकडेच एक अत्यंत संवेदनशील आणि प्रभावी दृश्य दाखवले गेले, ज्यात सेहज राजपूतने साकारलेल्या उन्नती ह्या व्यक्तिरेखेवर शारीरिक अत्याचार होतो.हे दृश्य मालिकेतील केवळ एक महत्त्वाचा टप्पा नाही, तर सेहज राजपूतसाठी त्याचे चित्रीकरण करणेही अत्यंत आव्हानात्मक ठरले.एपिसोडमध्ये, उन्नतीचा मार्ग काढत एक स्कॅमर (फसवणूक करणारा व्यक्ती) पार्टीत तिच्यावर हल्ला करतो. नुकत्याच प्रसारित झालेल्या या दृश्यातून त्या घटनेनंतर उन्नती कोणत्या खोल मानसिक आघातातून जाते हे ठळकपणे समोर येते. कॅमेऱ्याच्या मागेही हे चित्रीकरण सेहज राजपूतसाठी तितकेच कठीण होते कारण इतक्या तीव्रतेचे दृश्य तिने प्रथमच साकारले. अभिनेत्री म्हणून ती मानसिकदृष्ट्या तयार असली तरी शारीरिक अत्याचाराचे चित्रण करणे तिच्यावर भावनिकदृष्ट्या मोठा परिणाम करून गेले. त्या अनुभवाबद्दल बोलताना सेहज म्हणाली, "हे दृश्य माझ्यासाठी विशेषतः आव्हानात्मक होते कारण यात खूप शारीरिक हालचाली कराव्या लागल्या. त्या हल्लेखोराचा सामना करावा लागला आणि त्याला दूरही ढकलावे लागले. आमच्या दिग्दर्शकांनी ही पूर्ण प्रक्रिया खूप सहज आणि सोयीस्कर केली आणि त्यामुळे माझ्यासाठी ते सोपे गेले. त्या दृश्यात मी पूर्णपणे त्या भावविश्वात गेले. हे दृश्य करताना माझ्यावर भावनिक परिणाम झाला आणि त्याचा मानसिक ताणही आला. पण कलाकार म्हणून प्रत्येक भावनेला पूर्णपणे अनुभवणे आणि जगणे हाच माझ्या मते या कलाविश्वाचा सर्वात सुंदर भाग आहे. अभिनेत्री म्हणून हे दृश्य अत्यंत आव्हानात्मक होते. इतक्या कठीण दृश्यात काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल मी खरंच कृतज्ञ आहे कारण अशीच दृश्ये कलाकार म्हणून तुमची खरी परीक्षा पाहतात." त्या दृश्यासाठी आपल्या प्रेरणेबद्दल सेहज म्हणाली, "त्या अर्थाने आलिया भट्ट माझ्यासाठी मोठी प्रेरणा ठरली आहे. 'हायवे' चित्रपटातील ते दृश्य — ज्यात तिच्या पात्राला अनेक वर्षे सहन करावा लागलेला अत्याचार ती उघड करते — हे मी माझ्या अभिनय वर्गात सादर केले होते, त्यामुळे त्या भावना मी आधीही सरावलेल्या होत्या. तरीदेखील, वास्तविक आयुष्यात अशा प्रसंगांचा विचार करणेही खूप भीतीदायक वाटते." पुढील भागांमध्ये उन्नतीच्या मनातील त्या भीषण घटनेच्या आठवणींमुळे तिला येणारे पॅनिक अटॅक आणि तिची अस्थिर, असुरक्षित अवस्थाही मालिकेत दाखवली जाणार आहे.उन्नतीच्या आघातातून सावरण्याच्या प्रवासात रीत आणि राघव तिच्या सोबत कसे ठामपणे उभे राहतातहे'जाने अनजाने हम मिले'या मालिकेच्या आगामी भागांतील मुख्य आकर्षण ठरणार आहे. पहा मनाची पकड घेणारे हे नाट्य'जाने अनजाने हम मिले' दररोज रात्री 10:30वाजता फक्त झी टीव्हीवर!


## विवाहासाठी सजलेली कार्यालये ओस

पुणे : (समर्थ गांवकरी)

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या दुःखद घटनेने बारामती तालुक्यातील जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले आहे. या घटनेचा परिणाम चक्क नियोजित विवाह समारंभांवरही झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पवार यांच्या निधनाची माहिती कळताच सर्वत्र शांतता पसरली आणि तालुक्यातील अनेक विवाह समारंभ केवळ धार्मिक विधी उरकून अत्यंत साधेपणाने लग्न पार पाडण्यात आले. सनई-चौघड्यांचे आवाज थांबले, वाजंत्री शांत झाल्या, कुठेही डामडौल नव्हता. विवाहासाठी सजलेली कार्यालये ओस पडली होती. आनंदाचा गजर असावा, अशा ठिकाणी फक्त नीरव शांतता अनुभवायला मिळाली. वडगाव निंबाळकर येथील अभिजित प्रदीप दरेकर यांचा शुभविवाह शिरवळ (ता. खंडाळा, जि. सातारा) येथे नियोजित होता.

## चांदयातील मायनर क्र . सहा दत्तमळ्यात रंगला सोहळा

चांदा : (समर्थ गांवकरी)



अभंग एक, अभंग सोडविणारे महाराज एक, मात्र एकाच अभंगावर तब्बल नऊ दिवस कीर्तन सोहळा करण्याची किमया नेवासा तालुक्यातील चांदा येथील मायनर क्रमांक सहा वरील श्रीदत्त मळ्यात गेली पंधरा वर्षापासून चालू आहे .अखंड हरिनाम सप्ताह मध्ये नामवंत कीर्तनकारांची कीर्तने पार पडत असतात . दररोज एका अभंगावर एका नामवंत महाराजांची किर्तन सेवा ही अनेक सप्ताह मध्ये आपण पाहिले आहे .मात्र याला अपवाद चांदा येथील मायनर क्रमांक सहा वरील श्रीदत्त मळ्यातील हरी नाम सोहळा ठरला आहे .या ठिकाणी गेली पंधरा वर्षापासून जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज यांच्या गाथ्यातील एकाच अभंगावर रामायणाचार्य ह भ प पंडित महाराज भुतेकर यांनी तब्बल नऊ दिवस कीर्तन सेवा केली आहे . हा उपक्रम गेली पंधरा वर्षापासून या ठिकाणी सुरू आहे . त्यामध्ये बदल एवढाच कि दरवर्षी वेगवेगळा एक अभंग घेतला जातो . आणि त्यावर सलग नऊ दिवस कीर्तन सेवा पंडित महाराज भुतेकर हे करत असतात .

यावर्षीही हा सप्ताह संपन्न झाला . माघ शुद्ध दशमी या दिवशी जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराजांना त्यांचे गुरु बाबाजी चैतन्य यांनी अनुग्रह दिला. आणि जगाला उपदेश करणारा गाथा निर्माण झाला . यानिमित्ताने दरवर्षी माघ शुद्ध दशमीच्या वेळी सलग नऊ दिवस अखंड हरिनाम सप्ताह श्रीदत्त मळ्यात होत असतो .

यानिमित्ताने दररोज पहाटे पाच ते सहा काकडा भजन, सहा ते सात जगतगुरु तुकाराम महाराजांचा गाथा पारायण सोहळा, सायंकाळी चार ते सहा हरिपाठ ,व रात्री सात ते नऊ

उपाधिवेगळे तुम्ही निर्विकार ।
काहीच संसार तुम्हां नाही ॥
ऐसे मज करुनि ठेवा नारायणा
।समूळ वासना नुरवावी ॥
निसंग तुम्हासी राहणे एकट ।
नाही कटकट साहो येत ॥

## मराठी ZEE5 ओरिजनल सिरीज देवखेळ'मध्ये अंकुश चौधरी आणि प्राजक्ता माळी झळकणार, स्ट्रीमिंग सुरू

- चंद्रकांत लता गायकवाड दिग्दर्शित आणि निखिल पालांडे तसेच गौरव रेळेकर लिखित, कोकणी लोककथांपासून प्रेरित,गूढ निर्मिती करणारा मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपट; आता खास मराठी ZEE5वर स्ट्रीमिंग सुरू

मुंबई : (समर्थ गांवकरी)




ZEE5चा नवीन मराठी ओरिजनल देवखेळचे स्ट्रीमिंग आता केवळ मराठी ZEE5वर सुरू होत आहे. चित्तवेधक मानसशास्त्रीय गुन्हेगारी थरारपटाची ही मालिका कोकणातील समृद्ध लोकपरंपरेतून प्रेरणा घेते आणि शिमगा (होळी) सणाच्या उत्कंठावर्धक पार्श्वभूमीवर श्रद्धा, भीती आणि मानवी विवेक यांच्या नाजूक भावनांचा शोध घेते.

रत्नागिरी जिल्ह्यातील देवतालीच्या किनारपट्टीवरील गावावर आधारित, देवखेळचे कथानक एका थरारक परिस्थितीभोवती गुंफले आहे. दरवर्षी, होळी पौर्णिमेच्या रात्री एक मृत्यू होतो. कथा-कल्पनेत रमणारे गावकरी या मृत्यूंचे श्रेय शंकासुरला देतात. शंकासूर हे न्यायाचे प्रतीक म्हणून स्थानिक पातळीवर पूजले जाणारे एक पौराणिक लोक व्यक्तिमत्व आहे. जसजसे विधी सखोल होत जातात आणि विश्वास तर्कावर मात करू लागतो, तसतसे मौन हा जगण्याचा एक मार्ग बनतो. भय लोककथांच्या आड पिढ्यांनपिढ्या सत्य दडपून राहते.

दंतकथा हा हेतू म्हणून स्वीकारण्यास नकार देणाऱ्या इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या एंट्रीने कथेला निर्णायक वळण लागते. काळजीपूर्वक लपवून ठेवलेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना, देवखेळ विश्वास आणि तर्कशास्त्र, परंपरा आणि सत्य यांच्यातील तणावपूर्ण मानसिक लढाई सुरू करतो. या मालिकेत इन्स्पेक्टर विश्वास सरंजामेच्या भूमिकेत अंकुश चौधरीसह, प्राजक्ता माळी, यतीन कार्येकर, अरुण नलावडे, वीणा जामकर आणि मंगेश देसाई यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

प्रीमियरपूर्वी, मुंबईत देवखेळच्या स्पेशल प्रिव्ह्यूचे आयोजन करण्यात आले. ज्यात मुख्य कलाकारमंडळी म्हणजे अंकुश चौधरी, प्राजक्ता माळी, शिवानी रांगोळे आणि सुबोध भावे यांच्यासह मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक प्रमुख चेहरे उपस्थित होते. प्रेक्षकांना शंकासुराच्या जगात पूर्णपणे बुडवून टाकल्याने हे प्रदर्शन यशस्वी ठरले. उत्सवांच्या काळात एक विशिष्ट स्थानिक स्पर्श जोडत, विशेष ब्रँडेडदेवखेळ-ZEE5 ऑटोरिक्षा प्रमुख आकर्षण ठरली. ही ऑटोरिक्षा मालिकेच्या खोलवर रुजलेल्या परंतु लक्षवेधी सौंदर्याला प्रतिबिंबित करते.

मालिका आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद या दोन्हींबद्दल आपले विचार मांडताना अंकुश चौधरी म्हणाला, "देवखेळही कलाकृती रहस्यापेक्षा खूप अधिक आहे. विश्वास, भीती, शांतता आणि निवड यांना कशापद्धतीने आकार देतात याचा हा शोध आहे. विश्वास सरंजामे हे पात्र तर्कशास्त्र तसेच पुराव्यावर ठामपणे उभे राहते. तरीही ते श्रद्धा आणि शतकानुशतके जुन्या परंपरांचा पगडा असलेल्या जगाचा शोध घेते. स्क्रिनिंगदरम्यान माझ्या मनात विचार डोकावला; इथे असलेले प्रेक्षक किती गुंतून राहील; कथा कशी लक्षवेधक ठरेल. त्यांची शांतता बोलकी वाटली. ही सिरीज जरी लोककथांनी प्रेरित असली तरी ती केंद्रस्थानी असलेल्या मानवी मानसशास्त्र आणि नैतिक संघर्षाचा शोध घेते. इतका भक्कम, सकारात्मक प्रतिसाद पाहून मला खात्री पटली की कथा तिच्या मांडणीच्या पलीकडे खोलवर जोडली गेली आहे."

या सिरीजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणारी प्राजक्ता माळी पुढे म्हणाली, "देवखेळ'ला भावनिक वास्तववाद इतका आकर्षक बनवतो. हे समुदाय, विधी आणि भीती यांचे सहअस्तित्व कसे आहे आणि लोक अघोषित सत्य कशी जपून ठेवतात हे दर्शवते. कथानक हे लोककथांपासून प्रेरित असले तरी, ती एक काल्पनिक कथा आहे. ही कथा अंतर्गत संघर्ष आणि मानवी भावनांचा शोध घेण्यासाठी मिथकाचा पार्श्वभूमी म्हणून वापर करते. प्रेक्षकांसोबत पहिले काही भाग पाहतानाभावूक झाले होते.

त्यांची उत्सुकता, सहभाग आणि भावनिक संबंध अनुभवता आला. सांस्कृतिकदृष्ट्या रुजलेल्या परंतु मानसिक अंग असलेल्या सिरीजचा भाग होणे हा खरोखरच समृद्ध करणारा अनुभव आहे."

उत्कंठावर्धक कोकणाच्या पार्श्वभूमीवरील मांडणी, लक्षवेधी कथाकथन आणि सूक्ष्म सादरीकरणासह, देवखेळ एक आकर्षक काल्पनिक कथा सादर करते. हे कथासूत्र विश्वासाची शक्ती आणि निर्विवाद भीतीची किंमत तपासते. ते प्रेक्षकांना दडवून ठेवलेले सत्य शोधण्याचे, प्रश्न विचारण्याचे आणि खुलाशाकरिता आमंत्रित करते.